
रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक २०५
www.ramprahar.com

सोमवार, १० फेब्रुवारी २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## छत्तीसगडमध्ये चकमकीत ३१ माओवादी ठार



**बिजापूर** : छत्तीसगडमधील बिजापूर जिल्ह्यातील इंद्रावती राष्ट्रीय उद्यानात झालेल्या चकमकीत ३१ माओवादी ठार झाले असून सुरक्षा दलाचे दोन जवान शहीद झाले आहेत. अबुझमाडला लागून असलेल्या राष्ट्रीय उद्यानाचा भाग माओवाद्यांसाठी एक सुरक्षित आश्रयस्थान असल्याचे मानले जाते. २७९९.०८ चौरस किमीमध्ये पसरलेले हे उद्यान महाराष्ट्राच्या सीमेवर असून १९८३मध्ये त्याला व्याघ्र प्रकल्प म्हणून घोषित करण्यात आले होते. या उद्यानामध्ये एका भागात माओवादी असल्याची माहिती मिळाल्यानंतर सुरक्षा दलांच्या संयुक्त पथकाने केलेल्या कारवाईदरम्यान चकमक घडली, ज्यात ३१ माओवाद्यांचा खात्मा करण्यात आला, तर दोन शहीद झाले. इतर दोन जवान जखमी झाले असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

अंतरंग

स्वस्तात सोने देतो सांगून लुटले; चार जणांना अटक/२

कर्जत चारफाट्याची वाहतूक कोंडीतून लवकरच सुटका/५

मुंबई इंडियन्सचा दक्षिण आफ्रिकेतही डंका/८

# शिवसेना नेते प्रकाश देसाई भाजपमध्ये

## कार्यकर्त्यांसह केला पक्षप्रवेश; लोकप्रतिनिधींची उपस्थिती

**पाली : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात भारतीय जनता पक्षाचे प्राबल्य दिवसेंदिवस वाढत असून शिवसेनेचे रायगड जिल्हा संपर्कप्रमुख प्रकाश देसाई यांनी रविवारी (दि. ९) पाली येथे कार्यकर्त्यांसह भाजपमध्ये प्रवेश केला. या वेळी संपूर्ण पाली भाजपमय झाल्याचे चित्र पहावयास मिळाले.

या कार्यक्रमास राज्यसभा खासदार धैर्यशील पाटील, आमदार रविशेठ पाटील, आमदार प्रशांत ठाकूर, विधान परिषद आमदार विक्रांत पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभली.



या वेळी शिवसेना नेते प्रकाश देसाई यांच्यासह परळी ग्रामपंचायतीच्या सरपंच साक्षी देसाई, उपसरपंच अलका देशमुख व सदस्य, घोटवडे सरपंच व सदस्य, नेनवली, राबगावसह अन्य ग्रामपंचायतींमधील कार्यकर्ते व ग्रामस्थांनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. त्याचबरोबर माजी सभापती उज्वला देसाई, पिठू डुमना, पुष्पा डुमना, संजय परदेशी, सतीश देसाई, बापूराव देसाई व त्यांचे समर्थक तसेच विजयनगरमधील धर्मेंद्र आंदेकर, साईनाथ मित्र मंडळाचे कार्यकर्ते यांनीही विकासाचे 'कमळ' हाती घेतले.

आपल्या भाषणात खासदार धैर्यशील पाटील यांनी भाजपची ताकद सातत्याने वाढत असून आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी कार्यकर्त्यांनी कामाला लागावे, असे आवाहन केले.

आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, प्रकाश देसाई व सहकाऱ्यांनी भाजपच्या प्रवाहात सहभागी होण्याचा निर्णय घेतला ही निश्चितपणे चांगली बाब आहे. पक्षाच्या, शासनाच्या माध्यमातून विकासाची गंगा खेड्यापाड्यापर्यंत व शेवटच्या घटकापर्यंत पोहचत आहे, तर भाजप हा केवळ पक्ष नसून संस्कार असल्याची भावना आमदार विक्रांत पाटील यांनी व्यक्त केली. आमदार रविशेठ पाटील यांनीही देसाई यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

आपल्या मनोगतात प्रकाश देसाई म्हणाले की, केंद्रात आणि राज्यात सत्तास्थानी असलेल्या भाजपने विकासाचा रथ वेगाने पुढे नेला आहे. भाजप हा सर्व जाती, धर्म, पंथ यांना सोबत घेऊन जाणारा पक्ष असल्याने मी भाजपमध्ये जाण्याचा निर्णय घेतला. या वेळी भाजप नेत्या गीता पालरेचा, राजेश मपारा, आरिफ मणियार यांनीही विचार व्यक्त केले.

कार्यक्रमास भाजप जिल्हा उपाध्यक्ष आलाप मेहता, सुधागड तालुका अध्यक्ष श्रीकांत ठोंबरे, विठ्ठल सिंदकर, सुभाष पाटील, वैशाली मपारा, प्रणाली शेठ, सुशील शिंदे, भास्कर पार्टे, रमेश साळुंके, रोहन दगडे, नगरसेवक पराग मेहता, जुईली ठोंबरे आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भाजप नेते किरीट सोमय्यांनी घेतली शर्मा कुटुंबियांची भेट

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

खारघरमध्ये दोन युवकांकडून हेल्मेटने झालेल्या मारहाणीत मृत्युमुखी पडलेले शिवकुमार रोशनलाल शर्मा यांच्या कुटुंबियांची रविवारी (दि. ९) भाजप नेते माजी खासदार किरीट सोमय्या यांनी वाशी येथे जाऊन भेट घेतली. त्याचबरोबर प्रसारमाध्यमांशी संवाद साधत भूमिका स्पष्ट केली.



शिवकुमार शर्मा यांना दोन युवकांकडून हेल्मेटच्या सहाय्याने डोक्यात जबर मारहाण झाल्याची धक्कादायक घटना खारघरच्या उत्सव चौकात मागील रविवारी घडली होती. या वेळी शर्मा जखमी अवस्थेत आरोपींविरुद्ध तक्रार दाखल करण्यासाठी खारघर पोलीस ठाण्यात गेले. तिथे त्यांनी घडलेला सर्व प्रकार कथन केला. या दरम्यान शर्मा बेशुद्ध झाले. पोलिसांनी त्यांना रुग्णालयात नेले, पण त्यांचा मृत्यू झाल्याची माहिती डॉक्टरांनी दिली. या मारहाणीचा व्हिडीओ सोशल मीडियावरही व्हायरल झाला होता. दोन्ही आरोपी खारघर येथे आयोजित इज्तेमा कार्यक्रमावरून आले असल्याचे सांगितले जात आहे.

दरम्यान, भाजप नेते किरीट सोमय्या यांनी रविवारी शर्मा कुटुंबियांची भेट घेतली व सांत्वन केले. त्यांच्यासोबत भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, चिटणीस ब्रिजेश पटेल, संतोष शर्मा, शैलेंद्र त्रिपाठी, दिलीप जाधव, विपुल चौटालिया होते.

या वेळी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना भाजप नेते किरीट सोमय्या म्हणाले की, आरोपींच्या मागे असलेली ताकद मोठी आहे. भररस्त्यात एखाद्याला मारण्याची यांची हिंमत कशी होते? बांगलादेशात जसे हिंदूंना मारले तसे शिवकुमार शर्मा यांना मारले गेले. येत्या दोन दिवसांत आरोपींना पकडतो असे पोलिसांनी सांगितले आहे. तसे न झाल्यास वरिष्ठ अधिकारी या ठिकाणी पाठवा, अशी विनंती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना करणार आहोत.

# खोपोली होणार पुस्तकांचे गाव!

## मंत्री उदय सामंत यांची घोषणा

**खोपोली : प्रतिनिधी**

बु'ज हास्य परिवाराचा २२वा वर्धापन दिन व पुरस्कार रजनी सोहळा शनिवारी (दि. ८) संध्याकाळी लायन्स हॉलमध्ये उत्साहात झाला. या वेळी प्रमुख अतिथी राज्याचे मराठी भाषामंत्री उदय सामंत यांनी खोपोलीला पुस्तकांचे गाव म्हणून घोषित करण्याबाबत येत्या पंधरा दिवसांत शासनादेश काढण्याचे आणि त्यासाठी प्रत्येकी एक हजार पुस्तके असलेली ३५ घरे निवडण्याचे जाहीर केले.

नृत्य, संगीत, योग आणि वार्षिक पुरस्कार अशा विविध कार्यक्रमांचा समावेश असलेला या सोहळ्याला आमदार महेंद्र थोरवे हेही उपस्थित होते. या सोहळ्यात स्व. बळीरामशेठ (अण्णासाहेब) साखरे यांना मरणोत्तम जीवन गौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. हा पुरस्कार उदय (कुमार) साखरे यांनी सपरिवार स्वीकारला.

या वेळी हभप रामदास महाराज यांच्या 'माझी वारी' या पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. शोभा धायगुडे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व स्वागतपर भाषण केले, तर विजय घोसाळकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

**पनवेल** : भारतीय जनता युवा मोर्चा पनवेलतर्फे येथील विधानसभा मतदारसंघात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली आयोजित नमो चषक अंतर्गत रविवारी सायंकाळी कळंबोलीत भव्य कुस्ती स्पर्धा झाली. या स्पर्धेचे उद्घाटन युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे यांच्या हस्ते झाले. या वेळी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, शिवसेना जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, स्थायी समितीचे माजी सभापती व स्पर्धा संयोजक अमर पाटील, भाजप कळंबोली अध्यक्ष रविनाथ पाटील, शिवसेना शहरप्रमुख तुकाराम सरक, माजी नगरसेवक तेजस कांडपिळे, शिवकर सरपंच आनंद ढवळे, पैलवान बबन पवार, गौरव नाईक, देविदास खेडकर यांच्यासह कुस्तीप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

(सविस्तर वृत्त उद्याच्या अंकात)




## नमो चषकात रस्सीखेच स्पर्धा रंगली

# एलआरटी कामोठे आणि एसएमएनएस संघ विजेते





**कामोठे : रामप्रहर वृत्त**

नमो चषक अंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या रस्सीखेच स्पर्धेत पुरुषांच्या गटात एलआरटी कामोठे संघाने, तर महिलांच्या गटात एसएमएनएस संघाने प्रथम पटकाविला. पुरुषांच्या गटात द्वितीय क्रमांक जॅग्वार कामोठे व तृतीय क्रमांक मोरया फिटनेस कळंबोलीने, तर महिलांमध्ये एलआरटी रायडर्स कामोठे द्वितीय व तृतीय क्रमांक साई स्पोर्ट्स संघाने मिळवला.

उदयोन्मुख खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी भारतीय जनता युवा मोर्चा पनवेलतर्फे येथील विधानसभा मतदारसंघात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली भव्य क्रीडा महोत्सव अर्थात नमो चषक २०२५चे आयोजन करण्यात आले आहे. त्या अंतर्गत कामोठ्यातील लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या मैदानावर पुरुष व महिला गटाची रस्सीखेच स्पर्धा पार पडली. या स्पर्धेला आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, नमो चषकचे मुख्य आयोजक परेश ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

स्पर्धेचे उद्घाटन कामोठेच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक विमल बिडवे यांच्या हस्ते झाले. या वेळी प्रमुख मान्यवर म्हणून भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, माजी महापौर कविता चौतमोल, माजी उपमहापौर चारुशीला घरत, ज्येष्ठ नेत्या सुहासिनी शिवणेकर, माजी नगरसेविका राजेश्री वावेकर, हेमलता गोवारी, अरुणा भगत, जिल्हा चिटणीस विद्या तामखडे, प्रदीप भगत, रवी गोवारी, भाऊ भगत, लोकनेते रामशेठ ठाकूर स्कूलच्या मुख्याध्यापिका स्वप्नाली म्हात्रे, सरचिटणीस हर्षवर्धन पाटील, जय पावणेकर, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, जिल्हा सरचिटणीस अभिषेक भोपी, मनोहर शिंगाडे, सुहास शिवडकर, यमुना प्रकाशन, कामोठे शहर अध्यक्ष वनिता पाटील, उपाध्यक्ष साधना आचार्य, फातिमा आलम, मनीषा वणवे, वर्षा शेलार, सुरेखा लांडे, वैशाली घोलप, वैशाली साबळे, अरुणा शिंदे, जया गायकवाड, स्मिता यादव, विद्या शेलार, मयुरी जाधव, हर्षदा तुपे, सोनाली खरटमोल, दिपाली पवार, सारिका तामखडे, **(पान २ वर..)**



# आम्ही राजकारणाच्या पलीकडे जाऊन काम करतो -मंत्री भरत गोगावले

## कोकण समृद्ध करण्यासाठी कटीबद्ध -प्रवीण दरेकर

**महाड, पोलादपूर : प्रतिनिधी**

जनसामान्यांची सेवा करताना आम्ही राजकारणापलीकडे जाऊन काम करतो, असे प्रतिपादन रोजगार हमी व फलोत्पादनमंत्री भरत गोगावले यांनी कोकण पतसंस्था पोलादपूर शाखेच्या शुभारंभप्रसंगी केले. या वेळी महाडच्या माजी नगराध्यक्ष स्नेहल जगताप यांची व्यासपीठावरील उपस्थिती लक्ष वेधून घेत होती



स्वांतत्र्यापूर्वी १९३६ साली स्थापन झालेल्या कोकण क्षत्रिय मराठा को-ऑप.क्रेडिट सोसायटी लि मुंबईचे रोजगार हमी व फलोत्पादन मंत्री भरत गोगावले व मुंबई बँकेचे अध्यक्ष आमदार प्रविण दरेकर यांच्या शुभहस्ते शुभारंभ करण्यात आले. या प्रसंगी मुंबई हौसिंग फेडरेशन अध्यक्ष प्रकाश दरेकर, संस्थेचे अध्यक्ष राजेश येरुणकर, प्रसंन्न पालांडे, हिरवळचे किशोर धारीया, माजी नगराध्यक्ष स्नेहल जगताप, बिपीन महामुणकर, मुंबई बँकेचे सरव्यवस्थापक संदीप सुर्वे, नगराध्यक्ष सोनाली गायकवाड, शिवाईचे अध्यक्ष विनोद देशमुख, सुभाष पवार, चंद्रकांत कळंबे आदी मान्यवर उपस्थित होते.

दरम्यान या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष राजेश येरुणकर यांनी प्रस्तावना मांडताना कित्तेक वर्ष अंधेरी येथी एकाच शाखेत सुरू असणार्रा या संस्थेचा कारभार हाती घेताच प्रविण दरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली घाटकोपर आणि पोलादपूर या दोन शाखांचा विस्तार केला. संस्थेचे ५३०० सभासद असुन पाच कोटींच्या ठेवी व ४.५ कोटींचे कर्ज वाटप केले आहे. आजच या पोलादपूर शाखेच्या सुरवातीस एक कोटीचा ठेवी जमा झाल्या आहेत.

आमदार प्रविण दरेकरांनी आपल्या लोकासाठी आपल काहीतरी असाव याउद्देशान ही संस्था आणली आहे. कर्ज घ्या पण ते वेळेत फेडा म्हणजे पुढे आणखीन कर्ज मिळेल आणि संस्था अडचणीत येणार नाही. राजकारणाच्या पलीकडे जाऊन काम करणारे आम्ही आहोत. रोजगार हमी योजनेत २६४ आहेत. याच माध्यमातून विक्रमगड तालुक्यात असाच एक पयलट प्रोजेक्ट केला आहे. लखपती गाव संकल्पनेतून गावाचा विकास झाला आहे. म्हणून मी सांगतो शेतकऱ्यांनी जागा विकु नका, आम्ही वरकस जागेत बांबू लागवडीसाठी हेक्टरी सात लाख रुपये देऊ, परतफेड करु नका असा सल्ला शेतकऱ्यांना दिला.

आमदार प्रविण दरेकर यांनी १९३६ स्वातंत्र्य पुर्व काळातील ही संस्था वाढू का शकली नाही ? कोकणात सहकार कधी रुजलाच नाही ही खंत आहे. मी संस्थेची पहाणी केली आणि सहा महिन्यांत गती देत तिसरी शाखा सुरु केली. पश्चिम महाराष्ट्राचा विकास केवळ सहकाराच्या माध्यमातून झगला आहे. कोकणातल्या या संस्थाच बळकटी करण झाल पाहिजे. लग्न शिक्षणासाठी सोननाण गहाण ठेवणारे गोगरीब याच मातीतले आहेत, त्यांना या पत संस्थेच्या माध्यमातून प्रामाणिक पणे आधार देण्याचा मी प्रयत्न करणार आहे. महिलांच्या प्रकल्पाना आर्थिक मदत देण्यासाठी मी एकपाऊल पुढ टाकेन तुम्ही दोनपावल पुढ या. मुंबई त गिरणी कामगारांना कर्ज उपलब्ध करुन दिले आणि त्यांना घर भाड्यान देण्याची परवानगी मिळवून दिली. कोकणातल्या तरुणांना रेल्वे स्थानकावर फळांचे स्टॉल मिळण्याची मागणी केली आहे आणि हा मोदींचा स्वप्न प्रकल्प आहे त्याला आम्ही आर्थिक सहकार्य करु. माझ्या प्रत्येक्ष क्षणाचा उपयोग गोरगरीबांसाठी होईल तेव्हा त्यातच माझी गरमा असेल असे भावनिक विधान केले.

किशोर धारीया यांनी पोलादपूरमध्ये सहकाराच्या माध्यमातून रोजगार येणार कारण दरेकर आणि गोगावले हे दोन शक्ती स्थाने इथे आहेत.भाऊंसाठी कार्यकर्ता म्हणून काम करणार असल्याचे म्हणाले तर प्रकाश दरेकर यांनी वसंत दादा यांचा संदेश राजकीय पक्षाची पादत्राणे बाहेर काढून सहराच्या माध्यमातून गोरगरीबांचा विकास साधला जाऊ शकतो असे म्हणाले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नामदेव शिंदे यांनी केले

### स्नेहल जगताप व्यासपीठावर

***या वेळी मंत्री गोगावले यांनी, मतमोजणीच्या दिवशी शुभेच्छा देणाऱ्या ताई आज व्यासपीठावर आहेत याचा आनंद असून त्यांना तुम्ही घेतले काय किंवा त्या आमच्याकडे आल्या काय. एकच महायुती आहे. त्यांना कोणाकडे जायचे आहे त्यांनी ठरवावे, असा नर्मविनोदी शैलीत हळूवार चिमटा काढत महाडच्या माजी नगराध्यक्षा स्नेहल जगताप यांच्या संभाव्य पक्षांतराबाबत मिष्कील भाष्य केले.***

# स्वस्तात सोने देतो सांगून दोन सराफांना दीड कोटींना लुटले

## दोन पोलिसांसह चार जणांना अटक, एक फरार

**अलिबाग : प्रतिनिधी**

स्वस्त दरात सोने देतो असे सांगून नागपूर आणि कामोठे येथील सराफांचे एक कोटी ५० लाख रूपये लुटणाऱ्या पाचपैकी चार जणांना रायगड पोलीस दलाच्या स्थानिक गुन्हे शाखेने अटक केली. विशेष म्हणजे या गुन्ह्यात पाचपैकी तीन आरोपी पोलीस कर्मचारी आहेत. समाधान पिंजारी, दीप गायकवाड, पोलीस अंमलदार समीर परशुराम म्हात्रे व विकी सुभाष साबळे अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत, तर त्यांचा पोलीस साथीदार सुर्यवंशी फरार आहे.

सांगली जिल्ह्यातील आटपाटी येथील रहिवासी असलेला समाधान पिंजारी (वय २०) याने त्याच्या मूळ गावातील नागपूर येथे सराफ व्यवसाय करणारा नामदेव हुलगे यांच्याशी संपर्क साधून आपल्या ओळखीचा शंकर कुळे याच्याकडे सात किलो सोने आहे. तो हे सोने कमी दराने विकणार आहे असे सांगितले. हुलगे याने ही बाब कामोठे येथील त्यांचे नातेवाईक सराफ व्यावसायिक ओमकार वाकशे याला सांगितली. स्वस्त दराने मिळत असल्याने त्यांनी काही सोने खरेदी करण्याचा निर्णय घेतला. समाधान याने मी एक कोटी रुपये जमवले आहेत. तुम्ही जास्तीत जास्त रक्कम घेऊन अलिबागला या सांगितले.

ठरल्याप्रमाणे ३ फेब्रुवारी रोजी नामदेव हुलगे व त्याचा सहकारी नितीन पिंजारी याच्यासह ६५ लाख रुपये घेऊन ओमकार वाकशे यांच्याकडे आले. त्या दिवशी समाधान कामोठे येथे गेला. ओमकार यांनी ८५ लाख रुपये जमा केले. नामदेव व ओमकार यांनी मिळून एक कोटी ५० लाख रुपये जमा केले. ४ फेब्रुवारी रोजी दुपारी ३ वाजता नामदेव, समाधान, नितीन व नवनाथ पिंजारी हे सर्व रक्कम घेऊन अलिबागकडे निघाले.

समाधानने त्याचा सहकारी दीप गायकवाड याला इनोवा गाडी घेऊन पळस्पे येथे येण्यास सांगितले होते. पळस्पे येथ समाधानने हुलगे यांना पुढे चेकपोस्ट आहेत. तुमची गाडी येथेच ठेवून आपण मित्राच्या इनोवा गाडीतून अलिबागला जाऊ असे सांगितले. त्यानुसार सर्वजण रक्कम घेऊन दीप गायकवाडच्या इनोवा गाडीत बसले.

गाडी तिनविरा धरणाजवळ आली असता समाधानने गाडी थांबवून पुढे पोलीस चेकिंग चालू आहे. शंकरला तिनविरा येथे बोलावतो असे सांगितले. त्या वेळी दीपने गाडी पनवेलच्या दिशेने वळवून ठेवली. थोड्याच वेळात पोलीस अंमलदार समीर म्हात्रे, विकी साबळे मोटरसायकलवरून तेथे आले. समाधानने हुलगे व सहकाऱ्यांना पोलीस आले आहेत, गाडीतून उतरा असे सांगितले. त्यामुळे ते बॅगा गाडीत ठेवून खाली उतरले.

पोलीस अंमलदारांनी गाडीची तपासणी सुरु केली. तेव्हा दीपने गाडी पनवेलच्या दिशेन सुसाट पळवली. गाडीचा पाठलाग करून आरोपीला पकडून घेऊन येतो असे सांगून पोलीस अंमलदार निघून गेले. समाधान याने तो ज्या राजकीय नेत्याकडे मदतीसाठी गेला आहे त्याच्या घरी पोलिसांची धाड पडली आहे. पोलीस तुम्हाला पकडतील. तुम्ही मोबाईल बंद करून निघुन जा असे सांगितले. नामदेव व त्यांचे सहकारी कामोठे येथे निघून गेले.

५ फेब्रुवारी रोजी पोलीस हवालदार सूर्यवंशी याने त्याच्या मोबाईलवरून नामदेव यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, परंतु मोबाईल बंद असल्यामुळे त्यांच्या जवळच्या नातेवाईकाचा मोबाईल नंबर मिळवून त्याच्याशी संपर्क साधला. तुम्ही दोन कोटी रुपये घेऊन गेले आहात. ताबडतोब पोलीस ठाण्यात या. नाही आलात तर तुमच्या विरोधात गुन्हा नोंदवून अटक करू अशी धमकी दिली. सूर्यवंशीने केलेल्या कॉलमुळे नामदेव व त्यांच्या सहकाऱ्यांनी ७ फेब्रुवारी रोजी पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांची भेट भेटून घडलेली घटना सांगितली. याबाबात पोयनाड पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला. पोलिसांनी समाधान, दीप यांना अटक केली. त्यानंतर पोलीस अंमलदार समीर म्हात्रे व विकी साबळे यांना अटक केली. त्यांचा एक साथीदार फरार आहे.

# दिव्यांगांच्या जीवनात आनंदासाठी प्रत्येकाने सामाजिक काम करावे -खासदार तटकरे

**रोहे : प्रतिनिधी**

दिव्यांगांना जीवनात काही काळ आनंद देण्यासाठी प्रत्येकानी सामाजिक काम करावे असे आवाहन खासदार सुनील तटकरे यांनी करीत जेष्ठ नागरीकांची आरोग्य जीवन सुखकार कारण्यासाठी जेष्ठ नागरीकांचे आरोग्य शिबीर आपल्या मतदारसंघातील प्रत्येक तालुक्यात घेणार असल्याचे सांगितले

सामाजिक न्याय व अधिकार मंत्रालय, दिव्यांग सशक्तीकरण विभाग भारत सरकार एडीप योजना अंतर्गत सामाजिक अधिकारीता शिबीरात दिव्यांना निःशुल्क सहाय्यक उपकरण वितरण प्रसंगी जेष्ठ नागरिक सभागृह येथे खा.सुनील तटकरे बोलत होते

यावेळी गटविकास अधिकारी सुभदा पाटील, राज्य अध्यक्ष साईनाथ पवार, राष्ट्रवादी जिल्हा सरचिटणीस सुरेश मगर, विस्तार अधिकारी महारूद्र फडतरे, सुनील गायकवाड, माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे, अशोक महामुनी, रणजीत लवाटे, सुभाष राजे, महेंद्र गुजर, समिर सकपाळ, अप्पा देशमुख, प्रीतम पाटील, डॉ विश्वनाथ देशमुख, शिल्पा धोत्रे आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना खासदार तटकरे यांनी, भारत सरकारने दिव्यांगांसाठी राबविण्यात येत असलेल्या योजनेची व्याप्ती वाढवली आहे.ही योजना मी समजुन घेतली. विविध विकास कामे आता पर्यंत मी करत आलो.आज सर्व दिव्यांगाना वेगवेगळे उपकरणे १०० टक्के अनुदानातुन देण्यात येत आहे.मागील वेळी माझ्या लोकसभा मतदार संघात शिबीर घेत मी भारतसरकार कडे पाठपुरावा केला.

आज १५८ दिव्यांग लाभार्थ्यांना २५४ उपकरणे देण्यात येत आहे.त्यांच्याकडे जगण्याची प्रचंड उमेद आहे. स्वावलंबी जीवन जगण्याचे प्रयत्न दिव्यांग करीत असतात. त्यांना सामाजिक दायीत्वातुन देण्याचा प्रयत्न मी करत आहे. त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. जीवनात काही काळ त्यांना आनंद देण्यासाठी प्रत्येकानी सामाजिक काम करावे असे आवाहन करीत जेष्ठ नागरीकांची आरोग्य जीवन सुखकार कारण्यासाठी जेष्ठ नागरीकांचे आरोग्य शिबीर आपल्या मतदारसंघातील प्रत्येक तालुक्यात घेणार असल्याचे यावेळी खासदार तटकरे यांनी सांगितले यावेळी मोठ्या संख्येने दिव्यांग विविध शासनाच्या विभागाचे अधिकारीवर्ग उपस्थित होते.



# खालापूर पोलीस ठाण्याचा मी सुरक्षित, देश सुरक्षित उपक्रम

**खालापूर : बातमीदार**

विद्यार्थिनी, तरुणी, महिला यांच्यामध्ये सुरक्षिततेची भावना वृद्धिंगत व्हावी यासाठी खालापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सचिन पवार यांच्या संकल्पनेतून तयार झालेली पोलीस वहीचे सर्वत्र कौतुक होत आहे.




अल्पवयीन मुले, मुली महिला यांच्या अत्याचाराच्या घटना वारंवार घडत असून अनेक वेळा याबाबत कोणाची मदत घ्यावी याचे अज्ञानामुळे आरोपींचे फावते. कायद्याने अशा घटना रोखण्यासाठी केलेल्या विविध उपायोजनाची माहिती सहज उपलब्ध व्हावी यासाठी रायगड जिल्हा पोलीस अंतर्गत खालापूर पोलीस ठाणे व खालापूर तालुका पोलीस संघटना यांनी मी सुरक्षित देश सुरक्षित या आशयाची छापील वही तयार केली आहे.

या वहीच्या मुखपृष्ठावर आपत्कालीन व संकटकालीन परिस्थितीत मदतीसाठी असलेले फोन क्रमांक, खालापूर पोलीस ठाणे, चाईल्ड हेल्पलाईन क्रमांक, महिलांसाठी तसेच सायबर क्राईम तसेच तक्रारी साठी असलेले टोल फ्री क्रमांक छापण्यात आले आहेत. शिवाय वहीच्या मागील बाजूस पोलीस अधिकारी, महिला पोलीस कर्मचारी यांचे फोटोसह संपर्क क्रमांक छापण्यात आले आहेत. हजार वही छापण्यात आल्या असून विद्यार्थी, महिलांना वाटप करण्यात येत आहे. खालापूर पोलीस निरीक्षक सचिन पवार यांच्या उपक्रमाचे सर्वच थरातून कौतुक होत असून हा पॅटर्न राज्यात राबवावा अशी देखील मागणी आहे. पोलीस हे सर्वसामान्यांच्या रक्षणासाठी आणि दुष्टांच्या निर्दलन करण्यासाठी आहेत. अनेकदा पोलिसांबद्दल मनात भीती बाळगले जाते. शासनाने मुली महिला यांच्या सुरक्षिततेसाठी तयार केलेल्या अनेक आधुनिक प्रणालीची माहिती सर्व सामान्यपर्यंत पोहचवावी हाच उद्देश आहे.

# 'माथेरानच्या पर्यटनवाढीस चालना देण्याचा प्रयत्न केला जाईल'

**कर्जत : प्रतिनिधी**

जगातील सर्वात सुंदर पर्यटन स्थळ आपल्या मतदार संघात आहे. त्या मतदार संघाचा मी आमदार आहे. हीच माझी खरी ओळख आहे. फनिक्युलर रेल्वे प्रकल्पाचा अहवाल तयार करून माथेरानच्या पर्यटन वाढीस चालना देण्याचा प्रयत्न केला जाईल.' असे आश्वासन आमदार महेंद्र थोरवे यांनी दिले.



विक्रांत युवक मंडळ, माथेरान आणि श्री गणेश मंदिर जीर्णोद्धार समिती यांच्या पाठपुराव्यातून आणि राज्य सरकारच्या भरीव निधी मधून साकारलेल्या या मंदिराची श्री गणेश मंदिराचे आणि सभागृहाचे उद्घाटन आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी पालिका मुख्याधिकारी राहुल इंगळे, सहायक पोलिस निरीक्षक अनिल सोनोने, शिवसेना पक्षाचे शहरप्रमुख चंद्रकांत चौधरी, शहर संघटक व माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर, माजी नगरसेवक शिवाजी शिंदे, रुपाली आखाडे, महिला आघाडीच्या संगीता जांभळे, प्रमोद नायक, योगेश जाधव आदी उपस्थित होते.

थोरवे पुढे म्हणाले, ' पूर्वी या ठिकाणी संतश्रेष्ठ गाडगे महाराज यांची धर्मशाळा होती, जिथे ते वास्तव्यास होते. त्या धर्मशाळेची अवस्था जीर्ण झाल्यानंतर खासदार आणि आमदार यांच्या प्रयत्नाने नगरविकास विभागाच्या निधीतून गणेश मंदिर उभारण्यात आले आहे. माथेरान हे जगातील सर्वात सुंदर पर्यटन स्थळांपैकी एक असून माथेरानमध्ये देखील देश-विदेशातील पर्यटक मोठ्या प्रमाणात येतात. त्यामुळे 'पर्यटक देवो भव' या संकल्पनेचा आवलंब केला पाहिजे. याप्रसंगी माथेरानकर मोठ्या संख्येने उपस्थित होते

गेल्या पाच वर्षांत माथेरानच्या विकासासाठी ८८ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. स्थानिक नागरिक आणि व्यावसायिकांनी योग्य सुविधा उपलब्ध करून दिल्यास पर्यटकांची संख्या वाढेल आणि यामुळे व्यवसायालाही चालना मिळेल असा विकास आपल्याला साधायचा आहे. पार्किंगच्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी मंत्रिमंडळात लवकरच निर्णय घेतला जाणार असल्याचे आमदार महेंद्र थोरवे यांनी सांगितले.

पान १ वरुन

## नमो चषकात रस्सीखेच स्पर्धा रंगली

वनिता म. पाटील, ललिता दोपलपुडी, देवांशू प्रबाळे, आयुष किंद्रे, यश भोईर, गौरव नाईक, अक्षय सिंग, कामोठे अध्यक्ष तेजस जाधव, प्रवीण कोरडे, सागर ठाकरे, राहुल बुधे, आदित्य भगत, किरण जाधव, विकी टेकवडे, अमोल बिनवडे, अमित गोडसे, सुयोग वाफारे, प्रथमेश सातपुते, निलेश सरगर, आकाश शिंदे, शंकर कारंडे, सुयश कांबळे, मयुर शिंदे, प्राणिल पवार, आकाश सिंग, आयुष कातोरे, नयन चौगुले, पार्थ लाले, प्रज्वल, रितेश कानोजिया, ओम पाटील, करन जगदाळे आदी उपस्थित होते.

रस्सीखेच खेळ टग ऑफ वॉर या नावाने प्रसिद्ध आणि एक पारंपरिक खेळ आहे, जो ताकद, सहकार्य आणि रणनीती यांचा समतोल साधतो. या खेळात दोन संघ एकाच रस्सीच्या विरुद्ध बाजूंना उभे राहून एकमेकांना खेचण्याचा प्रयत्न करतात. जो संघ प्रतिस्पर्धी संघाला निश्चित मर्यादेपलीकडे खेचतो, तो विजेता ठरतो. हा खेळ हात, पाय आणि शरीराच्या स्नायूंना बळकट करतो. टीमवर्क आणि समन्वय वाढवण्याबरोबरच मानसिक तग धरण्याची क्षमता वाढवतो. हा खेळ खेळण्यास मजेदार असून शरीर तंदुरुस्त ठेवणारा असल्याने शाळा, महाविद्यालये, ग्रामीण भाग तसेच राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरही खेळला जातो. या खेळाचे महत्त्व लक्षात घेऊन या खेळाच्या प्रचारासाठी आणि खेळाडूंच्या विकासासाठी या स्पर्धेचे नमो चषक अंतर्गत भव्य दिव्य स्वरूपात आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेतील पुरुष गटातील प्रथम क्रमांक विजेत्या संघाला सात हजार रुपये व चषक, द्वितीय पारितोषिक पाच हजार रुपये व चषक, तृतीय पारितोषिक तीन हजार रुपये व चषक; महिला गटातील प्रथम पारितोषिक सात हजार रुपये व चषक, द्वितीय पारितोषिक पाच हजार रुपये व चषक तर तृतीय पारितोषिक तीन हजार रुपये व चषक असे बक्षीस देऊन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

# दहावी, बारावी विद्यार्थ्यांची हॉल तिकीटासाठी अडवणूक नको!

## नवी मुंबई महापालिका शिक्षण मंडळाचे शाळांना आवाहन

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिका क्षेत्रातील काही शाळांमध्ये विद्यार्थ्याचे शैक्षणिक शुल्क भरावयाचे बाकी असेल तर त्यांना दहावी / बारावी परीक्षेचे हॉल तिकीट दिले जात नाही सदरची बाब अत्यंत गंभीर असून यामुळे विद्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान होऊ शकते व त्याच्या भविष्यावर परिणाम होऊ शकतो म्हणुन अशा प्रसंगी पालकांनी नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागाकडे तक्रार करावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

या अनुषंगाने महानगरपालिका क्षेत्रातील सर्व खाजगी शाळा व्यवस्थापनांना नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागाच्या वतीने सूचित करण्यात येते की, एखाद्या विद्यार्थ्याचे शैक्षणिक शुल्क भरणा करणे पालकांच्या काही अडचणींमुळे शक्य होत नसेल तर त्यांच्याशी संवाद साधून शैक्षणिक शुल्क भरणा करणे आवश्यक असल्याचे त्यांच्या निदर्शनास आणून द्यावे व त्यांना शुल्क भरता यावे याकरिता पर्याय उपलब्ध करुन द्यावेत.

तथापि दहावी/बारावी परीक्षेचे हॉल तिकिट न देता त्यांची अडवणूक करु नये. शाळा सोडताना शाळेचा दाखला देण्यापूर्वी शैक्षणिक शुल्क भरून घेण्याचा पर्याय शाळा व्यवस्थापनाकडे उपलब्ध असताना अशा प्रकारे हॉल तिकिट देताना अडवणूक करणे अयोग्य आहे याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी. अशा प्रकारची कोणतीही तक्रार करावयाची असल्यास संबधित पालकांनी नवी मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांस ०२२-२७५६७०४३ अथवा उपआयुक्त शिक्षण संघरत्ना खिल्लारे यांस ०२२-२७५६७०६७ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात येत आहे.

## निवडक

### रेल्वे स्टेशनमधून तरुण बेपत्ता



**पनवेल :** रेल्वे स्टेशनमधून एक तरुण हरविल्याची तक्रार दाखल झाली असून रेल्वे पोलीस बेपत्ता तरुणाचा शोध घेत आहेत. बेपत्ता तरुणाचे नाव अक्षय काशिनाथ माने असून वय २७ वर्षे आहे. तो पनवेलमणील बावन बंगला येथील आदर्श सोसाटीमध्ये राहण्यास आहे. अक्षयची उंची पाच फुट पाच इंच असून बांधा सडपातळ, रंग गोरा, नाक सरळ, डोळे काळे आहे. त्याने अंगात पिवळा शर्ट व काळी जीन्स घातलेली आहे. अक्षयच्या डाव्या मनगटावर साक्षी नाव गोंदलेले आहे. अशा वर्णनाची व्यक्ती कोणास आढळल्यास त्यांनी पनवेल रेल्वे पोलीस ठाणे (२७४६७१२२) किंवा महिला पोलीस हवालदार बोराटे (९८२१४२५४०४) येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### हरवलेल्या व्यक्तीचा शोध



**पनवेल :** वाजेगाव गावातील एक ५० वर्षीय व्यक्ती २० जानेवारी २०२५पासून पनवेल रेल्वे स्थानकामधून हरविल्याची तक्रार पोलीस ठाण्यात दाखल झाली आहे. त्यानुसार पनवेल रेल्वे पोलीस त्या व्यक्तीचा शोध घेत आहेत. मंगेश शंकर शिंदे असे बेपत्ता व्यक्तीचे नाव असून उंची पाच फूट पाच इंच, बांधा सडपातळ, रंग गोरा, नाक बसके, डोळे काळे आहेत. अंगात नारंगी व पांढरा टी शर्ट, निळी हिरवी जीन्स आहे. त्यांच्या उजव्या हाताच्या दंडावर शंकराचा फोटो गोंदलेला आहे. अशा वर्णनाची व्यक्ती कोणास आढळल्यास त्यांनी पनवेल रेल्वे पोलीस ठाणे (२७४६७१२२) किंवा महिला पोलीस हवालदार बोराटे (९८२१४२५४०४) येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### गणेश मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळा

**पनवेल :** तालुक्यातील विहिघर येथील प्रयाग सिटी फेस वन या ठिकाणी श्री गणेश मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी पुण्याहवाचन, मातृकापूजन, देवता स्थापन, हवन, तत्त्वन्यास आणि मूर्तीची प्रतिष्ठा करण्यात आली. या वेळी महिलांसाठी होम मिनिस्टर कार्यक्रमात आकर्षक बक्षीस ठेवण्यात आली होती. आणि महिलांसाठी लकी ड्रॉमध्ये एक मानाची पैठणी देण्यात आली. त्यानंतर दहावी, बारावी उत्तीर्ण मुलांचा आणि ज्येष्ठ नागरिकांचा, सोसायटी कमिटी, पदाधिकारी आणि सभासदांचा सत्कार करण्यात आला. अभंगवाणी आणि भक्तीगीते सादर करण्यात आली. या वेळी प्रदीप कृष्णा भोपी, प्रिया प्रदीप भोपी, प्रयाग भोपी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# फरार चोरट्यांना अटक

## कंपनीतून लाखोंच्या मालाचा अपहार

**मोहोपाडा : प्रतिनिधी**


रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या कराडे बुद्रुक गावाजवळील अतिरिक्त पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रात प्लॉट नंबर एन. २९ व एन ३० या ठिकाणी बी.जी. एंटरप्राईजेस नावाची कंपनी असून याच कंपनीतील सुरक्षारक्षकांनी जवळपास १५ लाख २५ हजार रुपये किमतीचे साहित्य व मशिनरीचे पार्टस चोरून नेल्याचे उघडकीस आले असून तीन सुरक्षारक्षकांपैकी दोन जणांना रसायनी पोलिसांनी अटक केली आहे.



याबाबत सविस्तर वृत्त असे की, रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या कराडे बुद्रुक गावाजवळील अतिरिक्त पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रात बी. जी. एंटरप्राईजेस कंपनी आहे. याच कंपनीत सुरक्षितेच्या दृष्टीने एक्सलंट गार्ड फोर्स या सिक्युरिटीची एजन्सी ठेवण्यात आली असून एक्सलंट गार्ड फोर्सच्या तिघा सुरक्षारक्षकांनी आपल्या पदाचा गैरवापर करत तिघांनी संगनमत करून बी. जी. एंटरप्राईजेस कंपनीमध्ये पिडीलाइट इंडस्ट्रीज लिमिटेड या कंपनीचे ठेवण्यात आलेले १५ लाख २५ हजार रुपये किमतीचे साहित्य व मशनरी पार्टस् स्वतःच्या फायद्याकरिता लबाडीच्या इराद्याने चोरी करून नेले म्हणून रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून चोरीचा गुन्हा उघडकीस आणण्यासाठी व आरोपींना जेरबंद करण्यासाठी रसायनी पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवून दोघांना अटक केली आहे.

या घटनेची माहिती बी. जी.एंटरप्राईजेसचे चीप ऑपरेटिंग जेरोम योहनान जॉन (वय ३९) रा. सीबीडी बेलापूर यांनी रसायनी पोलीस ठाण्यात दिली असून चोरट्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी मोहम्मद शफीक मोहम्मद रफी, मोहम्मद युनीस अब्दुल करीम शेख दोन्ही रा. गोवंडी मुंबई यांना अटक करण्यात आली आहे, तर राजेशकुमार झा व इतर तीन फरार आहेत.

या प्रकरणी रायगड जिल्हा पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे, रायगड अप्पर पोलीस अधिक्षक अभिजित शिवतरे, खालापूर उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम, रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक प्रकाश माळी, श्री. धोंडे, पोलीस उपनिरीक्षक श्री. पवार (खालापूर पोलीस ठाणे), एएसआय कोळेकर, पोलीस हवालदार श्री. चौरे, श्री. बोडके, श्री. पिंगळे, पोलीस शिपाई राजेश वळवी, महेश लांगी यांनी आरोपींना अटक करून चोरीचा तपास लावण्यात यश मिळवले.




**पनवेल : मोरबे येथे श्री ज्ञानेश्वरी पारायण व भव्य अखंड हरिनाम उत्सव आयोजित करण्यात आला आहे. या वेळी भाजप तालुका चिटणीस नामदेव जमदाडे, मोरबे ग्रामपंचायत सदस्य रमेश नावडेकर, रामदास म्हात्रे, निवृत्ती नावडेकर, शशिकांत खुंटले, भगवान बोलाडे, पोलीस पाटील संजय पाटील, रवींद्र पाटील आदी उपस्थित होते.**

# कंटेनर कारवर उलटला

## कर्नाळा खिंडीत भीषण अपघात

**पनवेल : वार्ताहर**

ठाण्यावरून वडखळकडे जाणाऱ्या एका कारला भरधाव वेगात जाणाऱ्या कंटेनरने धडक देवून कारवर उलटल्याने या अपघातात एक ठार एक जखमी झाल्याची घटना कर्नाळा खिंडीत घडली आहे.



कार मध्ये असलेले पल्लवी जोशी या कार मालक ड्रायव्हर जगदीश हाजरा यांच्या सोबत ठाण्याहून वडखळ कडे जात होते. ते कर्नाळा खिंडीत आले असता भरता वेगात येणाऱ्या कंटेनरने गाडीला जोरदार धडक देत गाडीवरच पलटी झाला. कारचा अक्षरशः चक्काचूर झाला असून चालक जगदीश हाजरा यांना या अपघातात आपले प्राण गमवावे लागलेत. तर पल्लवी जोशी या गंभीररित्या जखमी झाल्या असून त्यांना उपचारासाठी तत्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तात्काळ धाव घेत जखमींना गाडीबाहेर काढले. हायड्राच्या सहाय्याने गाडीवरील पळटलेला कंटेनर बाजूला काढण्यात आला.


# आम्ही संघात का आहोत पुस्तकाचे प्रकाशन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विवेक प्रकाशन आणि भारत विकास परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आम्ही संघात का आहोत या पुस्तकाचे प्रकाशन शनिवारी (दि.८) पनवेलमध्ये झाले. पद्मश्री रमेश पतंगे यांनी लिहिलेल्या पुस्तकाचे प्रकाशन पनवेल शहरातील गोखले सभागृहात वरिष्ठ नेत्रशल्यविशारद डॉ.सुहास हळदीपुरकर यांच्या हस्ते झाले.

या प्रकाशन सोहळ्याला पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, भारत विकास परिषद पनवेलचे अध्यक्ष डॉ. कीर्ती समुद्र, विवेक प्रकाशन रायगड जिल्ह्याचे प्रतिनिधी गुरुराज कुलकर्णी, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

दरम्यान, विजय वेदपाठक यांनी लेखक पद्मश्री रमेश पतंगे यांची मुलाखत घेतली. या वेळी पद्मश्री रमेश पतंगे यांनी या पुस्तकात लिहिलेल्या विविध संदर्भ या मुलाखतीतून उपस्थित मान्यवरांच्या समोर सांगितले.




# उरण पोलिसांतर्फे नवीन कायदा व सायबर गुन्ह्यांबाबत जनजागृती

**उरण : प्रतिनिधी**

नवीन कायदा व सायबर गुन्ह्यांबाबत जनजागृती निर्माण करण्याच्या दृष्टीने उरण पोलीस ठाण्याच्या वतीने उरण कोटनाका येथील भोईर्स गार्डन हॉल येथे जनजागृती उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



या वेळी डोंबिवली येथील विविध सामाजिक उपक्रमात नियमित सहभागी होणाऱ्या मार्गदर्शिका ॲड. तृप्ती पाटील यांनी उरण मधिल महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थिनी आणि नागरिकांना नवीन कायद्या संदर्भातील माहिती व सायबर गुन्ह्याबाबतची नागरिकांना अत्यंत आवश्यक अशी जनजागृती केली.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालय व उरण पोलीस ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेल्या या कायदेविषयक जनजागृती उपक्रमात नागरिकांना नवीन कायद्याची जाणीव निर्माण करून सायबर गुन्ह्यापासून सुरक्षित राहण्याबाबातची माहिती व प्रबोधन केले. सायबर गुन्ह्यांच्या वाढत्या प्रमाणामुळे नागरिकांच्या सुरक्षेला धोका पोहचत असल्याचे ॲड. तृप्ती पाटील यांनी नमूद करीत, सायबर गुन्ह्यांबाबत माहिती दिली.

सायबर गुन्ह्याचे प्रकार, सुरक्षिततेसाठी कोणत्या गोष्टींचा अवलंब करावा, सायबरचे गुन्हे कशा प्रकारे टाळावे, याबद्दल विविध प्रकारच्या घटनांची उदाहरणे देऊन नागरिकांना सायबर गुन्ह्यापासून जागरूक कसे राहावे याची जाणीव करून दिली.

या जनजागृती उपक्रमात उरणचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र मिसाळ, पोलीस निरीक्षक शरद जाधव, सहाय्क निरीक्षक गोरे, उपनिरीक्षक विजय राऊत यांनीही मोलाचे मार्गदर्शन केले.तर या महत्वपूर्ण उपक्रमासाठी उरण उत्कर्ष समितीचे अध्यक्ष गोपाळ पाटील उरण शहरातील कोकण ज्ञानपीठ महाविद्यालय व उरण एज्यूकेशन सोसायटी महाविद्यालयाचे १२० हुन अधिक विद्यार्थी, विद्यार्थिनी उरण तालुक्यातील गावोगावचे पोलीस पाटील, पत्रकार आणि २० पोलीस अंमलदारांसह विविध सामाजिक क्षेत्रातील नागरिक उपस्थित होते. शेवटी उपक्रमात सहभागी झालेल्या सर्वांनी अत्यंत आवश्यक माहिती उरण पोलिसांकडून मिळाल्याचे समाधान व्यक्त केले.

# सीकेटी विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांचे शुभचिंतन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात मराठी माध्यमिक विभागाचा शुभेच्छाचिंतन कार्यक्रम शनिवारी (दि.८) झाला.



या कार्यक्रमास नाईकवाडी सर, माजी सहा. उपसंचालक, शिक्षण उपसंचालक कार्यालय, मुंबई विभाग हे उपस्थित होते. त्यांनी दहावीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर शुभेच्छा दिल्या.

नवीन पनवेलमधील के. आ. बांठिया माध्यमिक विद्यालयाचे माजी पर्यवेक्षक जे. के. कुंभार यांनी विद्यार्थ्यांना आपल्या मनोगतातून मौलिक मार्गदर्शन केले. विद्यालयाचे मुख्याध्यापक कैलास सत्रे यांनी आपल्या प्रास्ताविकपर मनोगतातून विद्यार्थ्यांना परीक्षेकरिता शुभेच्छा दिल्या तसेच मार्गदर्शन केले. इंग्रजी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक चव्हाण सर यांनी शुभेच्छापर मनोगत व्यक्त केले. इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी शाळेप्रती प्रेम आपल्या भाषणातून व्यक्त केले इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले त्यावेळी इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना अश्रू अनावर झाले.

या कार्यक्रमास उच्च माध्यमिक विभागाचे प्राचार्य प्रशांत मोरे, मराठी माध्यमिक विभागाचे पर्यवेक्षक कैलास म्हात्रे सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत उज्वल यश मिळावे यासाठी शुभेच्छा दिल्या.

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, अध्यक्ष अरूणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. श्री. एस.टी. गडदे तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक कैलास सत्रे, पर्यवेक्षक कैलास म्हात्रे यांनी इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेकरिता शुभेच्छा दिल्या.

# कळंबोलीत आरोग्य शिबिर

## ◆ उपमुख्यमंत्री शिंदेंच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली येथील मायरा हेल्थ केअर व सिद्धिविनायक हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त सिद्धिविनायक हॉस्पिटल कळंबोली या ठिकाणी रविवारी (दि.९) जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे यांनी भव्य आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले हीते.



साधेपणाने समाजोपयोगी उपक्रम राबवून वाढदिवस साजरा करण्याच्या मानस ठेवून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निकटवर्तीय मानले जाणारे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे यांनी हार, तुरे व बॅनबाजीला फाटा देत आरोग्य शिबिराचे आयोजन करून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा वाढदिवस साजरा करुन निरोगी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

मोफत आरोग्य तपासण्या सर्वसामान्य नागरिकांना भेटण्याविषयी सुंदर काम कोणतेही नसून या अतिशय स्तुत्य असा उपक्रम आहे. या आरोग्य शिबिरात शेकडो लोकांची तपासणी करून त्यांना मोफत औषधे दिली. या आरोग्य शिबिरासाठी सिद्धीविनायक हॉस्पिटल डॉ. संजय कदम एमडी (मेडिसिन) डॉ. पल्लवी कदम एमएस (शल्यचिकित्सक) डॉ. नैना पटेल एमएस (स्त्रीरोगतज्ज्ञ) यांचे सहकार्य मिळाले या वेळी शिवसेनेच्या वतीने आरोग्य शिबिरातील डॉक्टरांचा सत्कार करण्यात आला.

शिबिरादरम्यान रुपेश ठोंबरे, विनोद साबळे,डीएन मिश्रा, विलास कदम, सुनील गोवारी विशाल पवार यांनी उपस्थिती दर्शविली सदर चे शिबीर यशस्वी करण्यासाठी कळंबोली शहर प्रमुख तुकाराम सरक, रामदास शेवाळे प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्रीकांत फाळके, संजय शेडगे, निलेश दिसले, सिद्धेश म्हात्रे, दिपक कारंडे, सुमित सुर्यवंशी पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# प्रजापती संस्थेच्या कार्यकारिणीची बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राष्ट्रीय सामाजिक संस्था, पनवेल, नवी मुंबई, प्रजापती समाज विकास मंडळाच्या कार्यकारिणीची बैठक रविवारी (दि.९) पनवेल येथे संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ.भगवानदास प्रजापती यांच्या अध्यक्षतेखाली झाली.

बैठकीत सभासदांनी अनेक ज्वलंत प्रश्नांवर प्रकाश टाकून संघटनेच्या विस्तारावर भर दिला. बैठकीत पुढील तीन वर्षांसाठी प्रादेशिक स्तरापासून राष्ट्रीय स्तरापर्यंत नवीन कार्यकारिणी तयार करण्यात आली. ज्यामध्ये चंद्रप्रताप प्रजापती राष्ट्रीय अध्यक्ष, डॉ.भगवान दास प्रजापती कार्याध्यक्ष, गजेंद्र शिवशरण प्रजापती राष्ट्रीय मुख्य महासचिव, अधिवक्ता निहारिका प्रजापती राष्ट्रीय अध्यक्ष (महिला युवा सेल), डॉ.ज्ञानप्रकाश प्रजापती राष्ट्रीय संघटन सचिव, गोविंद प्रजापती राष्ट्रीय महासचिव चंद प्रजापती राष्ट्रीय प्रभारी प्रजापती चंद प्रजापती, राष्ट्रीय महासचिव डॉ – ८१ सदस्यांच्या कार्यकारी टीमसह राष्ट्रीय वित्त सचिव नियुक्त करण्यात आले.

बैठकीला डॉ.भगवानदास प्रजापती, चंद्र प्रताप प्रजापती, सर्वजित प्रजापती, गजेंद्र प्रजापती, संजय कुंभार, सूर्यनाथ परदेशी, राजकुमार प्रजापती, पी.एन. प्रजापती, गोवर्धन प्रजापती, मनोज प्रजापती, डॉ.ज्ञानप्रकाश प्रजापती, बळवंत प्रजापती, रोहित प्रजापती, लवकुमार प्रजापती, इंदर प्रजापती, राकेश प्रजापती आदी सदस्य सहभागी झाले होते.




# विचुंबे येथे हळदीकुंकू समारंभ



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष विचुंबे, दुर्गामाता मित्र मंडळ, मंगलमूर्ती मित्र मंडळ, रमाई महिला मंडळ आणि ग्रामस्थ मंडळ विचुंबे यांच्या वतीने हळदीकुंकू समारंभाचे आयोजन शनिवारी (दि.८) करण्यात आले होते. विचुंबे ग्रामपंचायतच्या कार्यालयाच्या बाजूला विठ्ठल रुक्मिणी मंदिरासमोर या कार्यक्रम मोठ्या उत्साहात झाला.

महिलांसाठी खास आकर्षण म्हणून होम मिनिस्टर, खेळ पैठणीचा, गप्पागोष्टी, रंजक खेळ, हिंदी मराठी गाणी सोबत कॉमेडीचा तडका अशा विविध कार्यक्रमांच आयोजन या वेळी करण्यात आले होते. या हळदीकुंकू समारंभाला पनवेल महापालिकेच्या माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी उपमहापौर चारुशीला घरत, माजी नगरसेविका राजश्री वावेकर, उपसरपंच स्वाती पाटील, सुहासिनी शिवनेकर, नीलम भिंगारकर, श्रावणी भोईर, आरती गायकवाड, प्रगती गोंधळी, विमुक्ती सुरते यांच्यासह आजी-माजी, सदस्य व भारतीय जनता पार्टीचे महिला कार्यकर्त्या आणि पदाधिकारी उपस्थित होते.

## संपादकीय

# दिल्लीत भाजपचे कमबॅक!

देशाची राजधानी दिल्लीच्या विधानसभा निवडणुकीत भाजपने दणदणीत विजय मिळवला आहे. सत्ताधारी आम आदमी पक्षाचा पराभव करून भाजपने २७ वर्षांनी दिल्ली विधानसभेच्या मैदानात बाजी मारली. या निवडणुकीत आपचा दारूण पराभव झालाच, शिवाय या वेळीही काँग्रेसची दांडी गूल झाली आहे.

**दिल्ली विधानसभा निवडणुकीत भाजपची सरशी होणार असा अंदाज विविध प्रसारमाध्यमे आणि संस्थांच्या एग्झिट पोल्सद्वारे वर्तविण्यात आला होता. तो खरा ठरला, परंतु भाजपने अपेक्षेपक्षा जास्त यश संपादन केले आहे. मद्य घोटाळा, भ्रष्टाचाराचे आरोप, माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल व सहकाऱ्यांची तुरूंगवारी, अनेक नेत्यांची सोडचिठ्ठी यामुळे आम आदमी पक्ष आधीच बॅकफूटवर गेला होता. त्यातच आपमध्ये समन्वय नव्हता. स्वत: केजरीवाल यांनी बालीश व बेताल विधाने करून भाजपला आयते कोलित दिले होते. भाजपने त्याचा खरपूस समाचार घेतला नसता तरच नवल! पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री अमित शाह यांच्यासह इतर नेत्यांनी आपच्या सरकारला 'आपदा सरकार' म्हणत जोरदार हल्लाबोल केला. आपने दिल्लीची कशी वाट लावली याकडे बोट ठेवतानाच भाजपने जनतेला सुशासन व विकासाची ग्वाही दिली. दिल्लीकरांना ते भावले आणि त्यांनी भाजपच्या पारड्यात मतांचे भरभरून दान दिले. दिल्ली विधानसभेच्या एकूण ७०पैकी ४८ जागांवर भाजपने विजय मिळवला. उर्वरित जागा आपला मिळाल्या. मागील निवडणुकीत आपने तब्बल ६२, तर भाजपने केवळ आठ जागा जिंकल्या होत्या. सलग दोन निवडणुका आपने जिंकल्यानंतर भाजपने त्यांची हॅट्ट्रिक रोखत पराभवाची धूळ चारली. वास्तविक, गेल्या लोकसभा निवडणुकीतच काही अंशी विधानसभा निकालाची झलक दिसून आली होती, जेव्हा राजधानीतील सर्वच्या सर्व म्हणजे पाच जागा भाजपने जिंकल्या होत्या. विशेष म्हणजे या विधानसभा निवडणुकीत आपचे सर्वेसर्वा आणि माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, माजी उपमुख्यमंत्री मनीष शिसोदिया यांच्यासह अनेक नेत्यांना पराभवाचे तोंड पहायला लागले आहे. एकंदर मागील दोन निवडणुकांमध्ये स्पष्ट बहुमत मिळवलेल्या आपची या वेळी मात्र दाणादाण उडाली. दिल्लीत आप, भाजप आणि काँग्रेस अशी तिरंगी लढत झाली होती. यातील काँग्रेस हा तिसरा पक्ष पुन्हा एकदा येथून गायब झाल्याचे चित्र आहे. काँग्रेसला पुन्हा एकदा खातेदेखील खोलता आलेले नाही. गेल्या तीन लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांमध्ये काँग्रेस पक्षाला एकही जागा मिळाली नाही एवढी दारूण अवस्था एकेकाळी देशावर अधिराज्य गाजवणाऱ्या या पक्षाची झाली आहे. सर्वात जुन्या पक्षाने शून्याची अनोखी डबल हॅट्ट्रिक साधली आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी, प्रियंका गांधी यांनी दिल्लीत जोरदार प्रचार केला होता. अनेक सभा घेऊन लंबीचौडी भाषणे दिली होती, मात्र तरीही ते काँग्रेसचे बुडते जहाज वाचवू शकले नाही. ते पाहता आता राहुलबाबांनी भाजपवर आरोप करण्याऐवजी स्वत: आत्मचिंतन करणे गरजेचे आहे. दरम्यान, या निकालानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हा विकास आणि सुशासनाचा विजय असल्याचे म्हटले आहे. यासोबत त्यांनी सर्वांगीण विकासासाठी आणि इथल्या लोकांचे जीवनमान सुधारण्यासाठी कोणतीही कसर सोडणार नाही, अशी गॅरंटीदेखील दिल्लीकरांना दिली आहे. विकसित भारताच्या उभारणीत दिल्लीची महत्त्वाची भूमिका आहे हे आम्ही सुनिश्चित करू आणि दिल्लीकरांच्या सेवेसाठी आणखी मजबुतीने काम करत राहू, असेही पंतप्रधानांनी आश्वस्त करीत राजधानीतील लोकाभिमुख कारभाराचे संकेत दिले आहेत.**

# चोरीच्या घटना वाढतायेत, नागरिकांनी दक्ष राहण्याची गरज



### खबरबात
विजय मांडे

कर्जत तालुक्यात विशेषतः शहरी भागात म्हणजे कर्जत शहर आणि नेरळ शहरामध्ये सातत्याने चोरीच्या घटना घडत आहेत. मग ती दुकान फोडी असो, मंगळसूत्र खेचून नेणे असो, घरफोडी असो किंवा जनावरांची चोरी असो या घटना वारंवार होतच असतात. अनेक वर्षे तालुक्यात दरोड्याचा घटना झाल्या नाहीत. मात्र अन्य चोऱ्या सुरूच आहेत. अर्थात त्याच्या बंदोबस्तासाठी पोलीस यंत्रणा कमीच पडणार कारण कर्जत आणि नेरळ पोलिस ठाण्यात मनुष्यबळ कमी आहे. त्यामुळे नागरिकांच्या दक्षते शिवाय चोरीच्या घटनांना आळा बसणार नाही.

९०च्या दशकाच्या मध्यंतरी चोरीच्या घटना वाढल्या होत्या. त्यावेळी ग्रामस्थांनी गस्त घालण्यास सुरुवात केली होती. त्यावेळी लोकसंख्या कमी असल्याने प्रत्येकाला दिवसाआड गस्तीसाठी जावे लागत असे. प्रत्येक गावात ग्रामस्थांची गस्ती पथके होती. पोलीस ठाण्यांकडून 'पोलीस मित्र'अशी ओळखपत्र गस्त घालणाऱ्यांना देण्यात आली होती. आता तर लोकसंख्या दुप्पट, तिप्पट झाली आहे. २००५ साली लोकसंख्या खूप कमी होती. कर्जत ग्रुप ग्रामपंचायत असताना म्हणावा तितका विकास त्यावेळी झाला नव्हता. त्याचे एकमेव कारण म्हणजे पाणी टंचाई. काही राजकारण्यांच्या प्रतिष्ठेमुळे पेज नदीचे पाणी कर्जत पर्यंत येऊ शकले नाही. मात्र २००६ मध्ये पेज नदीच्या पाण्यावर कर्जत वाढीव पाणी पुरवठा योजना सुरू झाली आणि बघता बघता कर्जतचा विकास झपाट्याने होऊ लागला. आता तर कर्जत नगरपरिषद हद्दीत बोटावर मोजण्या इतकेच भूखंड विकसित होण्यासाठी राहिले आहेत. कर्जत शहरात वाड्यांच्या इमारती झाल्या. एका वाड्यात एका कुटुंबाऐवजी इमारत झाल्याने २५-३० कुटुंबे आली. त्यामुळे चोऱ्याही वाढल्या आहेत. कर्जत हे महत्वाचे रेल्वे स्थानक असल्याने अगदी रात्रभर प्रवासी सेवा सुरू असते त्यामुळे चोर चोरी करून लगेचच लोकल किंवा एक्सप्रेस पकडून पळून जातात आणि पोलिसांना तपास करणे अवघड होऊन बसते.

तीस-बत्तीस वर्षांपूर्वी दरोडे पडत असत. असाच दरोडा १९९२ साली कडाव मध्ये पडला होता. त्यावेळी श्री बाल दिगंबर देवस्थानचे अध्यक्ष भालचंद्र तथा भाऊ उपाध्ये आणि कडवमधील मोठे व्यापारी शंकर भोपतराव यांच्या घरावर एकाच रात्रीत घरातील पुरुषांवर हल्ला करून त्यांना गंभीररीत्या जखमी करून लाखोंचा ऐवज दरोडेखोरांनी चोरून नेला होता. या दोन्ही व्यक्ती दहा - पंधरा वर्षांपूर्वी स्वर्गवासी झाल्या तरी त्या दरोडेखोरांचा तपास अद्याप लागला नाही. विशेष म्हणजे उपाध्ये यांचा एक सुपुत्र विनायक तथा अवी सैन्यात होता. त्यानेही अगदी वरच्या पातळीवरून तपास व्हावा यासाठी पत्र व्यवहार केला होता. त्याचाही काही उपयोग झाला नाही. एक गोष्ट आहे त्यानंतर तालुक्यात दरोडा पडल्याच्या घटना घडल्या नाही असे नाही. कर्जत शहरातील अतुल झुंजारराव यांच्या घरी सुद्धा दरोड्यासारखाच प्रकार झाला होता. त्यावेळी त्यांच्या वडिलांना मारहाण केली होती. त्यामुळे ते गंभीर जखमी झाले होते.

चोऱ्यांचे प्रकार वेगवेगळे आहेत. घरात कुणी नसताना घरफोडी करण्याचे प्रमाण जास्त आहे. रात्रीच्या वेळी दुकानांचे शटर कटावणीने किंवा जॅकने उचकटून चोरी करण्याचे प्रकार होत असतात. दुकान फोडीत जास्त ऐवज जात नाही. सुटी नाणी किंवा किरकोळ रकमेची चोरी होते. मात्र उचकटलेले शटर दुरुस्त करण्यासाठीचा खर्च चोरीच्या रकमेच्या दहा-वीस पट येतो. या चोऱ्या सीसीटीव्ही कॅमेरात कैद होत असतात, मात्र त्याचा तपास कधीच पूर्ण होत नाही. हे कटू सत्य आहे. कत्तलीसाठी चोरून नेणाऱ्या जनावरांच्या घटना सर्रास घडत आहेत. अनेक वेळा विश्व हिंदु परिषदेच्या कार्यकर्त्यांनी किंवा पशुप्रेमींनी या चोरांना पकडून पोलिसांच्या हवाली केले आहे. या चोऱ्या पकडल्यामुळे माहीत झाल्या परंतु अशा किती तरी जनावरांना कत्तल खान्यात नेण्यात येते याची निश्चितच गणती नसावी. कोतवाल नगरमध्ये राहणारे नरेंद्र झुंजारराव यांच्या घरात सन १९९५-९६मध्ये मध्यरात्रीच्या सुमारास सहा-सात जण दरोडा टाकण्याच्या इराद्याने शिरले. त्यावेळी झुंजारराव यांच्या पत्नी व अतुल, अजय, आशिष असे सर्व कुटुंबीय घरी होते. नरेंद्र यांना काही तरी गडबड असल्याचे लक्षात आले. त्यामुळे ते उठले व बाहेर आले. तितक्यात एकाने चापरने त्यांच्या डोक्यावर घाव घातला ते रक्तबंबाळ होऊन खाली पडले तसेच चोरट्यांनी अजय व आशिषला सुद्धा मारहाण करून जखमी केले. त्याच वेळी त्या इमारतीतील असिफ मिर्झा, राजन पतंगे, सकपाळ हे रहिवाशी आपली दारे उघडून बाहेर आले. त्यांनी ते दृश्य बघताच आरडाओरडकेल्याने ते दरोडेखोर पळून गेले.

अलीकडेच म्हणजे ऑगस्ट २०१८ मध्ये एक विचित्र दरोड्याची घटना किरवली कॉलनीत परिसरातील महेंद्र देशमुख यांच्या घरात मध्यरात्री २च्या सुमारास चोरटे घरात शिरले. ते सात जण होते. त्यावेळी घरातील काही लोक जागे झाले. त्यांनी देशमुख यांच्या पत्नी सौ. दीपा यांच्या डोक्यात काहीतरी घातले आणि त्यांच्याकडून लॉकर मधील सोन्याचे दागिने काढून घेतले. त्या चोरांनी त्या सर्वांना एका खोलीत डांबून बांधून ठेवले. त्यांना दमदाटी करून त्यांच्या कडील काही सोन्याचे दागिने व पैसे घेतले. त्याने त्यांचे समाधान झाले नाही. मग त्यांनी बँकेचे एटीएम कार्ड देशमुखांकडून बळजबरीने घेतले व पाच जण तेथे थांबून दोघांना तेथून सहा-सात किलोमीटरवर असलेल्या डिकसळ येथील एटीएम केंद्रावर पाठवून पैसे काढून घेतले व कार्ड परत आणून दिले. या दरम्यान पैसे काढताना पिन कोड चुकीचा सांगितला असला तर गडबड होऊ नये म्हणून मोबाईल मधून काढलेले सिम कार्ड एका मोबाईल मध्ये टाकून तो मोबाईल देशमुखांकडे दिला. इतकेच नाही त्यांच्याच कारची चावी घेऊन त्यांची गाडी घेऊन हे दोघे पैसे काढायला गेले होते. तब्बल सव्वा दोन तास या दरोडेखोरांनी देशमुख कुटुंबियांच्या घरात ठाण मांडले होते. तर इतकी त्या चोरांची हिम्मत झाली होती. या विचित्र चोरीचा तपास तत्कालीन पोलीस निरीक्षक सुजाता तानवडे यांनी शिताफीने लावला. त्यात टीप देणारा स्थानिक ग्रामस्थ व दोन सोनार आशा दहा जणांना ताब्यात घेतले होते. त्यानंतर देशमुख यांना सोन्याचे दागिने व रोकड सुद्धा परत मिळाली. एखाद्या सिनेमात घडावी. अशी घटना ही घडली होती. कविवर्य नारायण सुर्वे यांच्या घरी आधी चोरी नंतर चोराने केल्या चोरलेल्या वस्तु परत केल्या व माफीही मागितली. असेही चोर असू शकतात.

गेल्या वर्षी महिन्यात कर्जत नगरपरिषद हद्दीतील दहिवली विभागातील सुयोग नगर मध्ये राहणारे एक रहिवाशी लंडनला आपल्या मुलाकडे गेले होते. इकडे रात्री चोर त्यांच्या घरात प्रवेश करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे त्यांना सी सी कॅमेऱ्यात दिसले. त्यांनी त्यांच्या नातेवाईक व मित्रांना फोन करून ही घटना निदर्शनास आणून दिली आणि कर्जतच्या घरी असलेल्या लँड लाईनवर फोन केला. फोनची रिंग वाजताच चोरांनी चोरी करण्याचे सोडून तेथून काढता पाय घेतला. सुयोग नगर मध्ये गेल्या दोन वर्षात अनेक चोऱ्या झाल्या मात्र एकाही चोरीचा तपास लागला नाही. असे तेथील रहिवाशांचे म्हणणे आहे. अशा अनेक घटना होत आहेत. एकाच वेळी चार-पाच दुकाने फोडली जातात. डिकसळ येथील पेढी तून चोरी केलेल्या एका चोराला नेरळ पोलिसांनी पकडले आहे. पोलीस आपले काम करतात परंतु त्यांनाही मर्यादा आहेत. मोटार सायकल चोऱ्या होत असतात. महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्र किंवा सोन्याची चैन खेचून नेण्याचे प्रकारही होत आहेत. अलीकडे तांब्याच्या तारेसाठी विद्युत रोहित्र चोरीच्या घटनाही घडत आहेत. रेल्वे परिसरात किंवा लोकल, लांब पल्ल्यांच्या गाड्यांमध्ये सुद्धा चोऱ्या होतात. त्यातील अनेक चोऱ्या उघडकीस येऊन तब्बल तीस वर्षांनी सुद्धा मुद्देमाल परत मिळाल्याचा घटना आहेत. मोटार सायकलच्या चोऱ्यासुद्धा होऊ लागल्या आहेत. शहरातील अनेक सीसीटीव्ही नादुरुस्त आहेत. ते सुरु करण्याचे काम सुरु आहे.

पोलीस कर्मचारी कमी आहेत. यावर तोडगा काढण्यासाठी 'कर्जत शहर पोलीस ठाणे' स्वतंत्र केल्यास पोलीस निरीक्षक, पोलीस उप निरीक्षक, पोलीस सहाय्यक पोलीस निरीक्षक, हवालदार व पोलीस कर्मचारी अशी शंभर जणांची टीम असेल. त्यामुळे ग्रामीण पोलीस ठाणे स्वतंत्र होईल. तो निर्णय झाल्यास पोलीस ठाण्यात मनुष्यबळ वाढेल व सारे प्रश्न सुटतील. हे खरे असले तरी जकात नाक्याच्या जागी पोलीस चौकी उभारली आहे. तेथेही पोलीस कर्मचारी असणे आवश्यक आहे.



## बदलते तंत्रज्ञान

# पोळी बनवल्यावर एआय देणार तुम्हाला गुण!



आजच्या डिजिटल युगात जीमेल हा आपल्या जीवनाचाएक महत्त्वाचा भाग बनला आहे. सध्याचा काळ आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा (एआय) आहे. एआयचा वापर जवळपास प्रत्येक क्षेत्रात केला जातो आहे. शिक्षण, नोकरी आणि आता स्वयंपाकघरातसुद्धा एआय हस्तक्षेप करण्यास सुरुवात करणार आहे. कारण- आता तुम्हाला पोळी किती चांगली लाटता येते या तुमच्या कौशल्याला एआय गुण देणार आहे. अनेकदाआई किंवा होणारी सासू आपल्याला पोळ्या गोल लाटता यायला पाहिजेत, असे आवर्जून सांगते आणि त्याला नकळत त्यांच्या शब्दात गुण देते. तर हे कामआतएआय करणार आहे.
बंगळुरूच्या आयटी खरगपूर येथील विद्यार्थ्याने रोटी चेकर . एआय नावाचे एआय टूल विकसित केले आहे. हे नवीन एआय टूल पोळीच्या गोलाकाराचे मूल्यांकन करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा म्हणजेच एआयचा वापर करते आणि १०० पैकी तुमच्या पोळीला किती गुण मिळणार हे सांगते. एखाद्याच्या पोळी बनवण्याच्या कौशल्याचे मूल्यांकन करण्यासाठी हे एक मजेदार टूल आहे, असे म्हणायला हरकत नाही.एका युजरने अगदी अभिमानाने तिच्या गोलाकार रोटीचा फोटो शेअर केला आणि गोल पोळी बनवणेसुद्धा एक कला आहे (गोल रोटी बनाना भी एक आर्ट है) अशी कॅप्शन दिली. तर याच पोस्टपासून प्रेरित होऊन अनिमेश चौहान यांनी रोटी चेकर. एआय तयार केले. युजरने पोस्ट केलेल्या पोळीला एआय टूलने १०० पैकी ९१ गुण दिले आणि या टूलने पटकन लोकप्रियता मिळवली.
युजरने त्यांच्या लाटलेल्या पोळीचा फोटो रोटी चेकर . एआय वर अपलोड करायचा. त्यानंतर एआय पोळी किती गोल आहे याचे मूल्यांकन करते. त्यानंतर हे एआय टूल तुम्हाला १०० पैकी गुण देईल. तर अशा प्रकारे युजर्स त्यांच्या पोळी बनवण्याच्या कौशल्याचे मूल्यांकन करण्यासाठी एक मजेदार टूलची मदत घेऊ शकतात.
सोशल मीडियावर ही पोस्ट अमिनेश सिंघ ३८ या एक्स (ट्विटर) अकाउंटवरून शेअर करण्यात आली आहे. 'जर पोस्टला ४२० लाईक्स मिळाले, तर एआय लिंक सार्वजनिकरीत्या उपलब्ध करून देण्याचे आश्वासन अनिमेश चौहान यांनी कॅप्शनमध्ये दिले आहे.

# विदुषी दुर्गाबाई भागवत



### निमित्त

दुर्गा भागवत या मराठी लेखिका होत्या. इंदूर येथे १० फेब्रुवारी १९१० साली त्यांचा जन्म झाला. वैविध्यपूर्ण साहित्यप्रकारात त्यांचे मोठे योगदान आहे. यांत लोकसाहित्य, बालसाहित्य, बौद्धसाहित्य, कथा, चरित्र, ललित, संशोधनपर, समीक्षात्मक, वैचारिक लेखन यांचा समावेश होतो. त्यांचा फ्रेंच, जर्मन, इंग्रजी, संस्कृत, पाली या भाषा चांगल्या अवगत होत्या.

१९७५ साली इंदिरा गांधींनी देशावर लादलेल्या आणीबाणीला स्पष्ट विरोध करणाऱ्या म्हणून दुर्गाबाई विशेष मान्यता पावल्या होत्या. सुस्पष्ट प्रामाणिक विचार, छोटी छोटी वाक्ये, नादमय शब्द आणि अर्थातील सुबोधता हे दुर्गाबाईंच्या लेखनाचे वैशिष्ट्य होते. दुर्गाबाईंच्या लेखनात भारतातील सांस्कृतिक, पौराणिक, सामाजिक जीवनातले अनेक संदर्भ अभ्यासपूर्वक नोंदविलेले दिसतात. अभ्यास आणि लिखाण हे त्यांचे आस्थेचे विषय होते. म्हणूनच त्यांच्या लिखाणात संशोधन, विद्वत्ता आणि माहितीचा प्रचंड साठा या त्रयींचा अपूर्व संगम आढळतो. त्यांच्या लिखाणात स्पष्ट आणि प्रामाणिक विचारांबरोबरच कवी मनाची कोमलता आढळते. लोकसाहित्याच्या व्यासंगात बुडलेल्या दुर्गाबाईंच्या लेखनात लोकसाहित्याचा जिवंत रसरशीतपणा, मोहक साधेपणा, बोलभाषेची मांडणी आढळते, तसेच व्यासंग-चिंतन-मनन यांतून आलेले त्यांचे विचारही त्यांच्या साहित्यात दिसून येतात. दुर्गाबाईंच्या लेखनातील मौलिकता, अस्सल भारतीयत्व, सनातनत्व यांचा वेध घेण्याची शक्ती यांमुळे ललित निबंधाच्या क्षेत्रात त्यांनी एक नवा मानदंड निर्माण केला आहे. मुंबईतील एशियाटिक सोसायटीच्या त्या क्रियाशील कार्यकर्त्या होत्या.

संशोधन व साहित्य या क्षेत्रात रमणाऱ्या दुर्गाबाईंना पाककलेतही रुची होती. पाकशास्त्रात त्या पारंगत होत्या. त्यांनी काही नवीन पाककृतीही तयार केल्या आहेत. त्या विणकाम, भरतकामही उत्तम करत. दुर्गाबाई अविवाहित होत्या, घरातील कामात त्यांना विशेष आवड होती.

साने गुरूजींनी प्रेरीत केल्याने दुर्गाबाईं प्रथम ललितलेखनाकडे वळल्या. महानदीच्या तीरावर ही गोंडजीवनातील प्रेमकथा त्यांची पहिली ललितनिर्मिती. पुढे दीर्घ आजारपणातील बंदिस्त एकांत वासाने त्यांना नव्याने ललितलेखनाची प्रेरणा दिली. ऋतुचक्र या मराठीतील अपूर्व पुस्तकाचे लेखन त्यातून घडले. विविध ऋतूंतील निसर्गाच्या बदलत्या लावण्यविभ्रमांचे चित्रांकन करणाऱ्या या गद्यकाव्यात्म ललितनिबंधातून निसर्ग आणि मानव यांच्यातला गूढ ऋणानुबंध प्रतीत होतो.

आणिबाणीच्या काळात दुर्गाबाईंनी लेखन विचारस्वातंत्र्याचा जोरदार पुरस्कार केला व त्यासाठी कारावासही पत्करला. विद्वत्ता, ज्ञानसाधना, नवनिर्मिती यांचे अनुशासन नोकरशाहीच्या हाती असू नये व खऱ्या लोकशाहीची प्रतीमा सिद्ध करण्यास विचारवंतांनी प्रयत्नशील राहिले पाहिजे, अशी त्यांची भूमिका होती. कराड येथे भरलेल्या १९७५ सालच्या एक्कावन्नाव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले. मुंबई येथे वयाच्या ९२व्या वर्षी त्यांचे निधन झाले.

(साभार : मराठी विश्वकोश)

### बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# सकाळच्या श्वासोच्छ्वासाचे शरीराला होणारे फायदे



सकाळच्या वेळी मुलांना शाळेत सोडणे, घरातील जेवण बनवणे, ऑफिसला जाणे या सर्व कामांमध्ये बहुतेक लोकांसाठी सकाळची वेळ खूप घाई-गडबडीची असते. परंतु, त्यातूनही जर तुम्ही श्वासोच्छ्वासाच्या व्यायामासाठी थोडा वेळ काढला, तर ते तुमच्या आरोग्यासाठी अधिक फायदेशीर ठरू शकते, असं गॅरी ब्रेका म्हणाले. त्यांच्या मते, श्वासोच्छ्वासाचे व्यायाम खूप फायदेशीर ठरू शकतात. विशेषतः सकाळी उठल्यानंतर पहिल्या ३० मिनिटांत. हे डोपामाइन वाढवते. ते तुमचा मूड, भावनिक स्थिती सुधारते. तुमचा डायफ्राम तुमच्या आतड्यांना मालिश करतो. त्याशिवाय तुमच्या रक्तात ऑक्सिजन भरला जातो. त्यामुळे दिवसभर तुम्हाला उत्साही वाटते.

यासाठी घराबाहेर जा. ३० वेळा श्वास घेण्याच्या तीन फेऱ्या करा आणि तीन सेटमध्ये श्वास रोखून ठेवा.झोपताना आपण सक्रियतेने खोलवर श्वास घेत नाही. म्हणून जेव्हा तुम्ही जागे झाल्यानंतर पहिल्या ३० मिनिटांत जाणीवपूर्वक दीर्घ श्वास घेता तेव्हा तो व्यायाम तुमच्या शरीर आणि मनासाठी चमत्कार ठरू शकतो, असे 'हबिल्ड'चे संस्थापक व प्रमाणित योग प्रशिक्षक सौरभ बोथरा म्हणाले.हा व्यायाम तुमच्या मज्जासंस्थेला शांत करण्यास मदत करतो.रक्त प्रवाहित करतो.योग्य ऑक्सिजनद्वारे तुमच्या शरीर आणि मेंदूला ऊर्जा मिळते.तुमच्या शरीरातील प्रत्येक पेशी पुनरुज्जीवित होते.

सकाळी उठल्यानंतर ३० मिनिटांच्या आत नाकाने श्वास घेण्याचा व्यायाम केल्याने तुमच्या शरीर आणि मनाला फायदा होऊ शकतो. नाकाने आरामशीर श्वास घेणे, नाकातून पर्यायी श्वास घेणे व पोटातून श्वास घेणे यांसारख्या तंत्रांमुळे तुमच्या दिवसाची सुरुवात शांत होते. नाकातून श्वास घेऊन आणि बाहेर टाकून, तुम्ही हवेला आर्द्रता देता, श्वसनाचा आराम वाढवता व फुफ्फुसांच्या आरोग्याला चालना देता, असे डॉ. सिन्हा स्पष्ट केले.

झोपेतून उठल्यानंतर ३० मिनिटांच्या आत अनुनासिक किंवा नाकाच्या श्वसनाचा व्यायाम करणे महत्त्वाचे आहे. हा व्यायाम तुमच्या शरीरासाठी नैसर्गिक अलार्मप्रमाणे काम करतो. असे बोथरा यांनी सांगितले.स्थिती सुधारते. तुमचा डायफ्राम तुमच्या आतड्यांना मालिश करतो. त्याशिवाय तुमच्या रक्तात ऑक्सिजन भरला जातो. त्यामुळे दिवसभर तुम्हाला उत्साही वाटते.

# शिक्षकांच्या समस्या सोडवण्यासाठी सरकार प्रयत्नशील -मंत्री भरत गोगावले

**माणगाव : बातमीदार**

शिक्षण मंत्री दादा भुसे साहेब यांच्याशी आपली चर्चा घडवून आणून व निश्चितपणाने महायुती सरकार शिक्षकांच्या सर्व समस्या सोडवण्यासाठी प्रयत्नशील राहील असे अभिवचन मंत्री भरतशेठ गोगावले यांनी जिल्ह्यातील शिक्षण सेवकांच्या वतीने शिक्षण सेवक पद्धत बंद करावी व २००५ नंतरच्या सर्व शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करावी अशा आशयाचे निवेदन दिले त्यावर बोलताना असे अभिवचन दिले.




शिक्षण क्षेत्रात शैक्षणिक सेवा सोबतच विविध सामाजिक कार्य करणाऱ्या या जिल्ह्यातील आदर्श शिक्षकांना अखिल भारतीय प्राथमिक शिक्षक संघ रायगड जिल्हा शाखेच्यावतीने भरतशेठ गोगावले यांच्या हस्ते आठ फेब्रुवारी प्रदान करण्यात आले.यावेळी पेण प्राथमिक शिक्षक पतसंस्थेच्या निवडणूकीत संचालकपदी निवडून आलेले माणगावचे शिक्षक दत्ताराम शिर्के,क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त सचिन दरेकर, शिवमुमी रायगड जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त चंद्रकांत उतेकर, रमेश जाधव म्हसळा,अपूर्वा जंगम माणगाव, सुचिता जोशी उरण यांचा भरतशेठ गोगावले यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

संघटनेच्या वतीने प्रत्येक तालुक्यात आदर्श काम करणाऱ्या शिक्षकांचा आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. यामध्ये पोलादपूर तालुक्यातून संतोष शेलार ,महाड रवींद्र नाझरे, संगीता आंबेडकरम्हसळा ,महादेव बांगर माणगाव, वनिता धकिते उरण ,गीतांजली भाटकर श्रीवर्धन, राजेंद्र कुडेकर तळा, वृषाली गुरव पाली ,रमाकांत शिंदे रोहा, वाड्या गावित कर्जत, गजानन मालकर पनवेल, सदानंद म्हात्रे पेण ,रहिमा आदमाने मुरुड, रत्नाकर म्हात्रे अलिबाग यांचा गौरव करण्यात आला. विशेष शिक्षक व शिक्षिका म्हणून निशा मदने पोलादपूर, स्नेहा निकम महाड, सुषमा शिवदे माणगाव, महमद आसिफ मुकादम म्हसळा, राजश्री पेरवी पेण, स्मिता सावंत पनवेल, सुनिता पिंगळे माणगाव यांचा गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी रायगड जिल्हा शिक्षक संघाचे अध्यक्ष सोपान चांदे हे होते तर कोकण विभाग प्रमुख प्रमुख पाटील, राज्य संघटक ज्योति कुडूनकर ,राज्य संघटन राज्यसंयुक्त किशोर मोहिते ,राज्यमहिला आघाडी सचिव रंजना केणी यांची प्रमुख उपस्थिती होती. त्याचप्रमाणे रत्नागिरी जिल्हाध्यक्ष प्रवीण काटकर शिवगण, गटशिक्षणाधिकारी राजन सुर्वे व तांबट मॅडम उपस्थित होते.

# माथेरानमध्ये अपघातात दोन महिला, चालक जखमी

**नेरळ : प्रतिनिधी**

माथेरान घाटात दोन वाहनांच्या अपघातात दोन पर्यटक महिला व वाहन चालक गंभीर जखमी झाला आहे.

पर्यटकाना घेवून माथेरान येथून नेरळ दिशेला निघालेली इको कार आणि समोरून घाट चढत असलेला पिकअप टेम्पो यामध्ये हा अपघात घडला.जखमींना स्थानिक वाहन चालकांनी नेरळ येथील डॉक्टर शेवाळे यांच्या रुग्णालयात उपचारासाठी तत्काळ दाखल केले होते.

मुंबई कांजूर मार्ग येथील राहणाऱ्या सात महिला व त्यांची लहान मुले सोबत असा एक ग्रुप हा माथेरानला फिरण्यासाठी आला होता.रविवार दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास या महिला घरी जाण्यासाठी निघाल्या होत्या.माथेरान दस्तुरी नाका येथुन दोन वाहन बुक केले होते. इको कारमध्ये बसून निघालेले हे पर्यटक कड्यावरचा गणपती दिशेला घाट उतरत असताना इकोकार चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि



कार समोरून येणाऱ्या मालवाहू पिकअप टेम्पोला धडकली.

या अपघातात दोन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले असून सारिका विचारे या महिलेच्या डोक्याला जबर मार लागला तर सोनाली सावंत यांच्या खांद्याला मार लागला वाहन चालक कैलास उर्फ फायटर विरले हा देखील जखामी झाला. जखमींना नेरळ येथील डॉक्टर शेवाळे यांच्या रुग्णालयात दाखल केलेत यांना अधिक उपचारासाठी मुलुंड येथे हलवण्यात आल्याचे सांगितले आहे. सोबतच वाहन चालक कैलास विरले याला अधिक उपचारासाठी बदलापूर येथे हलवण्यात आले आहे. वाहनचालकाच्या डोक्याला ११ टाके पडल्याचे सांगण्यात आले आहे.

# कर्जत चारफाट्याची वाहतूक कोंडीतून लवकरच सुटका

## * बायपासबद्दल केंद्रीय मंत्री नितीन गडकरी अनुकूल

**कर्जत : प्रतिनिधी**

मुंबई आणि पुण्यातून येणारे पर्यटक आणि नाशिक भागातून येणारी अवगज वाहने यांच्यासाठी कर्जत येथील चारफाटा वाहतूक कोंडीचा केंद्रबिंदू असतो. त्यामुळे वाहतूक कोंडीवर मात करण्यासाठी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी साकारात्मक आहेत. कर्जत येथील भाजप कार्यकर्ते सुनील गोगटे यांनी नवी दिल्लीत कर्जत बायपास बद्दल मागणीचे निवेदन दिले होते.





मुंबई-कर्जत आणि कर्जत-मुंबई प्रवास तसेच नेरळ-माथेरान रोडसाठी चार फाटा हा महत्त्वाचा मार्ग आहे, मात्र येथे रेल्वे क्रॉसिंग करता फक्त एकच छोटा पूल असल्यामुळे मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी निर्माण होते. त्यामुळे वाहतूक अनेक तास खोळंबते त्यामुळे प्रवाशांचा वेळ वाया जातो आणि कर्जत शहरातील नागरिकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागतो. शहापूर, मुरबाड, कर्जत आणि खोपोली ते नागोठणे जोडणारा राष्ट्रीय महामार्ग हा महत्त्वाचा मार्ग असून, यावर मोठ्या प्रमाणावर कंटेनर वाहतूक होते. या ट्रॅफिक समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी कर्जत बायपास मार्गाची नितांत गरज आहे. या संदर्भात केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांच्याकडे नवी दिल्ली येथे भेट घेऊन निवेदन देण्यात आले.

हा रस्ता राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्याकडे असून या विभागाचे कार्यकारी अभियंता संदीप पाटील यांच्याकडे सुनील गोगटे यांनी सतत पाठपुरवा केला होता. त्यातून कार्यकारी अभियंता कार्यालयाने कर्जत बायपास रस्त्याचे अंदाजपत्रक तयार केले आहे. आपल्या भेटीत गोगटे यांनी कर्जत बाँयपास रस्त्याच्या अंदाजपत्रकाची प्रत आणि कर्जतकरांची मागणी असलेली निवेदनाची प्रत सादर केली.

केंद्रीय रस्ते विकास वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी या राष्ट्रीय, महामार्गावरील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी कर्जत बायपासला लवकरच मंजुरी मिळेल, असे आश्वासन नितीन गडकरी यांनी दिले आहे. त्यामुळे हा बायपास साकारला गेला तर कर्जत शहरात प्रवेश करताना वाहनचालकांना वाहतूक कोंडीतून सुटका होण्यास मदत होणार आहे.

# रोहा येथे कॉपीमुक्त परीक्षा अभियान अंतर्गत पर्यवेक्षकांना मार्गदर्शन

**नागोठणे : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे मार्फत परीक्षेच्या कालावधीत परीक्षा केंद्रावर होणारे गैरप्रकार रोखण्यासाठी एक उपयुक्त अभियान राबविण्यात येत आहे. येणारी परीक्षा कॉपीमुक्त अभियानांतर्गत यशस्वी पार पडावी व सदर परीक्षेमध्ये कोणत्याही विद्यार्थ्यांनी गैरप्रकार कॉपी करू नये व परीक्षा निर्भयपणे तसेच शांत वातावरणात पार पाडावी असे सपोनि आनंद रावडे यांनी र्यवेक्षकांना मार्गदर्शन करताना सांगितले.

रोहा येथील कोकण एज्युकेशन सोसायटीचे मेहेंदळे हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय केंद्र क्रमांक २७११ मध्ये दिनांक ११फेब्रुवारी ते १८मार्च २०२५ या कालावधीत उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र इयत्ता बारावी तसेच दिनांक २१फेब्रुवारी २०२५ते १७मार्च २०२६या कालावधीत माध्यमिक शालांत परीक्षा इयत्ता दहावी सुरू होणार आहेत . सदर केंद्रावरील परीक्षा कॉपीयुक्त व्हावी यासाठी मेहेंदळे हायस्कूलमध्ये मार्गदर्शन सभा आयोजित केली होती.

या सभेसाठी रोहा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक आनंद रावडे, हेड कॉन्स्टेबल जयेंद्र पेडवी तसेच केंद्र संचालक तथा प्राचार्य रमेश मोसे,उपकेंद्र संचालक मारुती लोहकरे,ज्येष्ठ शिक्षक नारायण पानसरे, के आर पाटील,संग्राम गायकवाड व मेहेंदळे हायस्कूल परीक्षा केंद्रात येणाऱ्या विद्यालयातील पर्यवेक्षक उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना सपोनि आनंद रावडे पुढे म्हणाले की, या परीक्षा दरम्यान विद्यार्थ्यांनी कोणतेही दुष्कृत्य करू नये तसेच डमी विद्यार्थ्यांचा वापर करू नये. यासाठी शालेय कर्मचारी त्याचप्रमाणे शालेय कर्मचारी व्यतिरिक्त कोणालाही परीक्षा केंद्रावर येण्यास बंदी करावी .

रोहा पोलीस ठाणे व तहसील कार्यालयामार्फत होणारे गैरप्रकार रोखण्यासाठी येणारे शासकीय कर्मचारी यांना सदरील परीक्षा केंद्रावरील पर्यवेक्षकांनी सहकार्य करावे व ही परीक्षा यशस्वी होण्यासाठी मदत करावी.ही परीक्षा कॉपीमुक्त अभियान अंतर्गत यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी लागणारी सर्व पोलीस यंत्रणेसह आम्ही सहकार्य करू असे ते शेवटी म्हणाले.

# रोहा यार्ड येथे मंगळवारी विशेष वाहतूक ब्लॉक

**रोहे : प्रतिनिधी**

मध्य रेल्वे मंगळवारी (दि.११) रोहा यार्डमधील अप रोडवरील पॉइंट क्रमांक १२६ब आणि १२७ए च्या ओव्हरराइडिंग स्विच बदलण्यासाठी ब्लॉक परिचालीत करणार आहे. रोहा येथे अप व डाउन मुख्य मार्गांवर सकाळी ११.१५ ते दुपारी ३.४५ पर्यंत ब्लॉक घेण्यात येईल.

ब्लॉकमुळे गाडी क्रमांक १६३४५ लोकमान्य टिळक टर्मिनस-तिरुवनंतपुरम नेत्रावती एक्सप्रेस प्रवास ११.०२.२०२५ रोजी सुटणारी. गाडी क्रमांक १६३४६ तिरुवनंतपुरम - लोकमान्य टिळक टर्मिनस नेत्रावती एक्सप्रेस १०.०२.२०२५ रोजी सुटणारी. गाडी क्रमांक १२६१७ एर्नाकुलम - हजरत निजामुद्दीन एक्सप्रेस दि. १०.०२.२०२५ रोजी सुटणारी. गाडी क्रमांक १९५७७ तिरुनेलवेली - जामनगर एक्सप्रेस १०.०२.२०२५ रोजी सुटणारी. या गाड्या १० ते १५ मिनिटे उशिराने चालतील:

# रसायनीतील चोरीप्रकरणी दोन आरोपी अटकेत

**खोपोली: प्रतिनिधी**

रसायनी पोलीस ठाणे हद्दीत बी.जी.एंटरप्राइजेस कारखान्यातून १५लाख २५हजार रुपये किंमतीचे पिडिलाइट इंडस्ट्रीज लिमिटेड कारखान्याचे साहित्य चोरून नेणाऱ्या मोहम्मद शफीक मोहम्मद रफीक शेख व मोहम्मद युनिस अब्दुल करीम शेख रा. गोवंडी यांना पोलिसांनी शिताफीने अटक केली.

त्यांच्याकडून सुमारे १२ लाख ४१ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल आणि वीस लाख रुपये किमतीचा टेम्पो पोलिसांनी जप्त केला आहे. रसायनी पोलीस ठाणे हद्दीत कराडे गाव येथे बी.जी. एंटरप्राइजेस कारखाना आहे. २७ जानेवारी दरम्यान कारखान्यात चोरीची घटना घडली होती. याबाबत गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पोलीस अधीक्षक रायगड सोमनाथ घार्गे,अपर पोलीस अधीक्षक रायगड अभिजीत शिवतरे अलिबाग, उपविभागीय पोलीस अधिकारी खालापूर विक्रम कदम यांचे मार्गदर्शनाखाली गुन्ह्याचे तपासा करता तीन पथके तयार करण्यात आली होती. रसायनी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संजय बांगर पोलीस उपनिरीक्षक प्रकाश माळी, पोलीस उपनिरीक्षक एस धोंडे, खालापूर पोलीस निरीक्षक सचिन पवार, कोळेकर, पोलीस हवालदार एम चौरे,आर बोडके, एस पिंगळे, पोलीस शिपाई वळवी असे अधिकारी व अंमलदार नेमण्यात आले होते.

या पथकाने घटनास्थळापासून ते कोन गावं तसेच नवी मुंबई परिसरातील एकूण ५० ते ६० सीसीटीव्ही कॅमेऱ्याची पडताळणी केली. त्यामध्ये चोरी केलेला माल घेऊन जाण्याकरता वापरण्यात आलेला अशोक लेलँड टेम्पो निष्पन्न केला. टेम्पो नंबरच्या आधारे पोलीसांनी मोहम्मद शफीक मोहम्मद रफीक शेख व मोहम्मद युनिस अब्दुल करीम शेख याना अटक केली. या गुन्ह्यातील राजेश कुमार झा व इतर तीन आरोपींचा शोध पोलीस घेत आहेत.


राम प्रहर

वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी


# जंजिरा किल्ल्यावर पर्यटकांची तुफान गर्दी

**मुरुड : प्रतिनिधी**

शनिवार रविवार सुट्टीचे औचित्य साधून आज सुप्रसिद्ध जंजिरा किल्ला पहाण्यासाठी पर्यटकांनी तुफान गर्दी केली होती पुणे, औरंगाबाद, परभणी,कल्याण,डोम्बवली,सांगली आदी भागातील पर्यटकांनी आज जंजिरा किल्ला पहाण्यासाठी सकाळ पासून गर्दी केली होती. खोरा व राजपुरी येथील वाहन तळावर वाहनांची मोठी गर्दी पहावयास मिळाली.आज मुरुड व काशीद समुद्र किनारी सुद्धा मोठी गर्दी होती. शनिवारी सकाळी ९.३० पासून पर्यटकांना किल्ल्यात नेणे सुरु झाले.शिडांच्या व मशीन बोटीच्या साह्याने खोरा व राजपुरी बंदरातून पर्यटकांना किल्ल्यात नेण्यात येत होते. जंजिरा किल्ल्यावर जाताना प्रत्येक पर्यटकाला लाइफ जाकीट घालणे सक्तीचे करण्यात आले आहे.बोटी मध्ये बसल्यावर सेल्फी घेण्यास ही मज्जाव करण्यात आला आहे.राजपुरी जेट्टी वर कोणताही गैर प्रकार होऊ नये यासाठी ठिक ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत.राजपुरी येथील नवीन जेट्टी वरून पर्यटकांना किल्यावर नेले जाते व किल्ल्यातून जुन्या जेट्टीवर पर्यटकांना सोडले जाते त्यामुळे पर्यटकांची गर्दी न होता यामध्ये सुरळीतपणा आला आहे जंजिरा किल्ल्यात खूप छान स्वछता करण्यात आली आहे.झाडी झुडपे कापण्यात येऊन पर्यटकांना मोकळे पणाने फिरण्यासाठी मोठी मुभा प्रदान करण्यात आली आहे.जंजिरा किल्ल्यावर दोन गोड्या पाण्याची तलावे अगदी स्वछ करण्यात आली आहेत.किल्ल्यावरील कलालबांगडी सह इतर तोहफा सुद्धा सुंदर रित्या ठेवण्यात येऊन ठिकठिकाणी फलक लावण्यात आले आहेत.





जंजिरा किल्ल्यावर जाण्यासाठी प्रत्येक व्यक्तीस १०० रुपये तिकिट बोटीचे आकारले जाते तर किल्ल्यात प्रवेश करण्यासाठी पुरातत्व खात्याकडून प्रत्येक व्यक्तीस २५ रुपये तिकीट घेण्यात येते.जंजिरा किल्ल्यात जाणाऱ्या प्रत्येक व्यक्ती कडून १० रुपयाची लेव्ही महाराष्ट्र मेरी टाइम बोर्डास मिळत असते.


JANARDAN BHAGAT SHIKSHAN PRASARAK SANSTHA'S
**RAMSHETH THAKUR PUBLIC SCHOOL, KHARGHAR**

Plot No. 11 & 11A, Sector 19, Kharghar, Navi Mumbai : 410210
CBSE Affiliation No:1130299 Website: www.rtpsk.in

**STAFF REQUIRED**

**Applications are invited for the following posts for the Academic Year 2025-26 for immediate appointment.**

| Posts | Qualifications |
|---|---|
| Vice-Principal (01) | M.A./M.Sc. and B.Ed. /M.Ed. With atleast 50%Marks in Graduation and Post-Graduation (Minimum 08 years' experience of teaching Secondary and 05 years in Administrative work.) |
| TGT (01) English - 1 | M.A. and B.Ed. With atleast 50% Marks in Graduation and Post- Graduation in the English Subject. |
| PRT (02) English- 1, S.St-1 | B.A./M.A and B.Ed. With atleast 50% Marks in Graduation in the English and S.St Subject. |

**Only those candidates who have passed STD-X from an English medium School should apply.**

**Note:** Interested candidates can send their resume with passport size photograph and self-attested copies of documents to Chairman, JBSP Sanstha at, Ramsheth Thakur Public School, Kharghar, Plot No. 11 & 11A, Sector-19, Kharghar, Navi Mumbai-410210. Candidates may also submit the application by email to **rtpskhgr@gmail.com** or WhatsApp on **9987077043** on or **Before 25/02/2025 (Tuesday).**

**For additional information contact: Mrs. Raj Aloni - 9821537023 / Mr. Ajay Kumar Yadav - 9664268045**

**Shri Ramsheth Thakur (Ex. M.P.)**
**Chairman, Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha, Panvel**



MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender** specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tender -37 **(RFX.7000034401)** | RFx e-tender for work of repairing of 22/33kV Current Transformer/ Potential Transformer at various substations under EHV (O&M) Division Panvel….**3rd call.** **(Tender Fee Rs. 500/- + 18% GST)** | **Limited to Rs.7,50,000/-** |
| Tender -39 **(RFX.7000034481)** | RFx E-tender for work of providing of earthwire at missing earthwire span without block /outage with the use of special T&P like Tension & Puller machine at various locations of 220kV & 100kV Lines under EHV Line S/Dn. Panvel - I & II under EHV (O&M) Division Panvel…. **3rd call.** **(Tender Fee Rs. 500/- + 18% GST)** | **Rs.21,48,860/-** |

EMD 1% of estimated cost for each Tender., **Submission of bids from 10.02.2025 to 20.02.2025 up to 10:59 hrs, Bid Opening date:-20.02.2025 @ 11:00 Hrs for all tender.** For further details visit our website https://srmetender.mahatransco.in/ Contact Person: The Add. Executive Engineer (O) Mob. No.9769213818, E-mail ID ee7210@mahatransco.in

**SD/-**
**EXECUTIVE ENGINEER, EHV(O&M) DN PANVEL**

## निवडक

### तीन मजली इमारत जमीनदोस्त

**नवी मुंबई :** घणसोली विभागातील तळवली येथे उभारण्यात येत असलेल्या एका बेकायदा तीन मजली इमारतीवर सिडकोने शनिवारी धडक कारवाई केली. सिडकोच्या अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाने या बांधकामाला नोटीस बजावली होती. बांधकाम थांबविण्याचे निर्देश दिले होते, मात्र त्यानंतरही बांधकाम सुरूच राहिलेल्या अडीचशे चौरस मीटर क्षेत्रफळाच्या जागेवर उभारलेल्या या इमारतीवर मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाईचा बडगा उगारला. कारवाईची मोहीम अधिक तीव्र करणार असून, विनापरवाना बांधकामे उभारू नयेत, असे आवाहन सिडकोच्या संबंधित विभागाने केले आहे.

### स्थानिक सुट्ट्या जाहीर

**नवी मुंबई :** ठाणे जिल्हा महसूल हद्दीतील शासकीय कार्यालयांसाठी शासनाने सन २०२५ करिता जाहीर केलेल्या सार्वजनिक सुट्ट्यांव्यतिरीक्त तीन सार्वजनिक सुट्ट्या कोंकण विभागीय महसूल आयुक्त डॉ. राजेश देशमुख यांनी परिपत्रकाव्दारे जाहीर केल्या आहेत. ठाणे जिल्हा महसूल हद्दीतील शासनाच्या सर्व खात्यांमधील कार्यालयांकरिता शासनाने सन २०२५ करिता जाहीर केलेल्या सार्वजनिक सुट्ट्यांव्यतिरिक्त ८ ऑगस्ट २०२५ शुक्रवार नारळी पौर्णिमा, २ सप्टेंबर २०२५ मंगळवार जेष्ठागौरी विसर्जन, २० ऑक्टोबर २०२५ सोमवार नरक चतुर्दशी या तीन स्थानिक सुट्ट्या जाहीर करण्यात आल्या आहेत. या दिवशी ठाणे जिल्हयातील सर्व शासकीय कार्यालये बंद राहतील, असे कोकण विभागीय महसूल आयुक्त डॉ. राजेश देशमुख यांनी एका प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# काहीजण वाघाचे कातडे पांघरलेले कोल्हे

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा उद्धव ठाकरेंना टोला

**नवी मुंबई : बातमीदार**

जनता फेसबुक लाईव्ह करणाऱ्यांच्या मागे राहत नाही तर फेस तू फेस काम करणाऱ्यांच्या मागे राहते. कावळ्याच्या शापाने गाय मारत नाही. संताजी धनाजी जसे स्वप्नात यायचे तसे मी त्यांच्या स्वप्नात येतो. खरा वाघ कोण हे जनतेने दाखवून दिले आहे, मात्र काहीजण वाघाचे कातडे पांघरलेले कोल्हे आहेत, अशी टीका उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नवी मुंबई ऐरोलीत केली. ते मेळाव्यात बोलत होते.

या वेळी काँग्रेसचे माजी उपमहापौर रमाकांत म्हात्रे, माजी उपमहापौर मंदाकिनी म्हात्रे, माजी नगरसेविका अनिता मानवतकर, काँग्रेसचे युवक प्रदेश उपाध्यक्ष अनिकेत म्हात्रे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी काँग्रेसला रामराम करत शिंदे सेनेत प्रवेश केला.

मी डॉक्टर नाही मात्र लहान मोठी ऑपरेशन मी करतो असे म्हणत एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंना टोला लगावला. सत्तापालट झाल्यावर ३२ देशांनी माझ्याविषयी चर्चा केली. मला कोणी हलक्यातात घेऊ नका मी बाळासाहेबांचा शिवसैनिक आहे.



तुमची माणसे सांभाळा, पक्ष का सोडतात ते आत्मचिंतन करा, मग मला शिव्या देण्याचा एकमेव कार्यक्रम सुरू आहे. लोकसभेला यांनी फेक नरेटीव्ह पसरवले, मात्र शेवटी राज्यातील लाडक्या बहिणींनी विधानसभेला आम्हाला पाठिंबा दिला. लाडक्या पात्र बहिणीने त्यांचा लाभ मिळत राहील, अशी ग्वाही देतो असे शिंदे म्हणाले. राजधानीत महाराष्ट्राप्रमाणे भगवा फडकला. भ्रष्टाचाराचे फडके दिल्लीकरांनी फेकून दिले. महाराष्ट्रातील अनेक कोपऱ्यातून शिवसेनेत प्रवेश होत आहे. प्रवाह करणाऱ्यांचा ओघ वाढला आहे. २३ राज्यांमध्ये शिवसेना पसरली आहे असे शिंदे म्हणाले.

जे प्रवेश करतात ते बाळासाहेब आनंदी दिघेंच्या विश्वास ठेवून प्रवेश करत आहेत. प्रवेश केलेले काँग्रेसचे माजी उपमहापौर रमाकांत काँग्रेसमध्ये असले तरी ते दिघे व माझ्या जवळचे होते. त्यामुळे माझ्यावर विश्वास ठेवून त्यांनी प्रवेश केला. आम्ही विकासाला चालना दिली. माविआनी बंद पडलेले प्रकल्प आम्ही सुरू केले. लोकाभिमुख योजना आम्ही सुरू केल्या. त्यामुळे आम्हाला देदिप्यमान यश आम्हाला मिळाले लाडक्या बहिणी पाठीशी उभ्या राहिल्या. मी सीएम म्हणून नाही तर कॉमन मॅन म्हणून काम केले. आता डेडिकेटेड कॉमन मॅन म्हणून काम करत आहे. हम जहा खडे रहते है वहा सोशल वर्क सुरू होता है असे म्हणत शिंदेंनी अमिताभ यांची डायलॉगबाजी केली. मी कधी खुर्चीसाठी मी कासावीस नव्हतो. मुख्यमंत्री देवेंद फडणवीस आणि आम्ही टीम म्हणून काम करतोय, मात्र आमच्यात गैरसमज पसरवले जात असल्याचेही उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

**खरी शिवसेना लोकांनी दाखवली**

स्व. बाळासाहेब सर्वांना सवंगडी, सहकारी समजायचे, मात्र काही लोक कार्यकर्त्यांना घरगडी समजू लागले. त्यामुळे त्यांच्यावर ही परिस्थिती ओढवली. आपण ८० जागा लढवल्या ६० जिंकल्या, उबाठाने ९७ जागा लढवून २० जागा जिंकल्या. आपला मतदानाचा टक्का वाढला. खरी शिवसेना लोकांनी दाखवली. हा झंझावात पाहता दिल्लीत आपचे १५ उमेदवार माझ्याकडे उमेदवारी मागत होते, मात्र विरोधी पक्षाला त्याचा फायदा होऊ नये म्हणून भाजपला समर्थन देण्यास सांगितले, असा खुलासा उपमुख्यमंत्री शिंदेंनी केला.

**नवी मुंबईतील भूमिपुत्र वंचित राहणार नाही**

आमच्या महायुती सरकारने इतिहासात नोंद होईल इतके, ऐतिहासिक निर्णय घेतले. नवी मुंबईतील भूमिपुत्र वंचित राहणार नाही. पाण्याची गरजदेखील शहराची गरज भागवू, असे शिंदे म्हणाले.

# वाशीत भाजपकडून दिल्ली दिग्विजयाबद्दल जल्लोष

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

दिल्ली विधानसभा निवणुकीच्या निकालात भारतीय जनता पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाल्याने बेलापूर विधानसभा क्षेत्राच्या आमदार मंदा म्हात्रे यांनी वाशी येथील भारतीय जनता पक्ष जनसंपर्क कार्यालयात कार्यकर्त्यांसह फटाके फोडून आणि पेढे भरवून जल्लोष केला.

विकास हवा असेल तर भाजप आणि नरेंद्र मोदींचेच नेतृत्व हवे आहे दुसरा पर्याय नाही असे विधान या वेळी आमदार मंदा म्हात्रे यांनी पत्रकार बांधवांशी बोलतांना सांगितले. याच बरोबर ८ फेब्रुवारी २०२५ रोजी भाजप जनसंपर्क पक्ष कार्यालयात जनसंवाद मेळाव्याला नागरीकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. नेहमी प्रमाणे त्यांच्या



वाशी येथील जनसंपर्क कार्यालयात जनसंवाद मेळाव्या घेण्यात आला. या वेळी वाशी विभागातील तसेच नवी मुंबईतील सारसोळे, नेरुळ, तुर्भे व कोपरखैरणे आणि घणसोलीतील अनेक नागरीकांनी त्यांच्या कामानिम्मित्त भेट घेतली. त्यामध्ये प्रामुख्याने महीला, ज्येष्ठ नागरीकांचा मोठ्या प्रमाणात समावेश होता.

विरंगुळा केंद्र, निवारा शेड, नवीन धार्मीक स्थळांसंदर्भातील न.मुं.म.पा व सिडको संबंधित विविध कामे आदी गोष्टींचा त्यात समावेश होता. यांनी कामासंदर्भात आमदार मंदा म्हात्रे यांनी संबंधित अधिकारी यांच्याशी तात्काळ संपर्क करून कामे मार्गी लावल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले. नवी मुंबई स्पोर्ट असोसिएशनतर्फे घेण्यात आलेल्या निवडणुकीत भाजपचे राजु शिंदे हे व्यवस्थापनाच्या सदस्यपदी निवडुन आल्याने त्यांचा सत्कार ही करण्यात आला.

या वेळी आमदार मंदा म्हात्रे यांच्या समवेत अनिल कौशिक, माधवी शिंदे, विकास सोरटे, मुकुंद विश्वासराव, प्रताप भोसकर, रामकृष्ण अय्यर, राखी पाटील, प्रमिला खडसे, मालती सोनी, मंगेश चव्हाण, महेश दरेकर, जेम्स आवारे, प्रवीण चिकणे आदी प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

# नवी मुंबई पालिकेतील कंत्राटी कामगारांचे आज आंदोलन

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेत तथाकथित कंत्राटी पद्धतीवर एकूण आठ हजार ०५० कामगार कार्यरत आहेत. २००७ साली समान काम समान वेतन लागू करण्यात येऊनदेखील त्याची नवी मुंबई पालिकेने अंमलबजावणी केलेली नाही.

यासाठी गेली ३२ दिवस कंत्राटी कामगारांनी नवी मुंबई पालिका मुख्यालयासमोर उपोषण केले होते, मात्र त्याची साधी दखलदेखील घेतली गेली नव्हती. अखेर या लढाईला निर्णायक स्वरूप प्राप्त झाले असून, १० फेब्रुवारीला तारखेला पालिकेत काम करणारे सर्व कामगार काम बंद आंदोलन करणार असून त्यामुळे पालिकेची 'कचरा कोंडी' होण्याची शक्यता आहे.

यासोबत इतर विभागातीलदेखील कंत्राटी पद्धतीवरील कामगार या संपात सहभागी होणार असून, यामुळे पाणीपुरवठा विभाग, उद्यान, स्मशानभूमीतील कामगार देखील यात सहभागी होणार आहेत. त्यामुळे कचरा कोंडीसोबत नागरिकांच्या मूलभूत सुविधांवरदेखील त्याचा परिणाम होणार असण्याचे समाज समता कामगार संघटनेचे मंगेश लाड यांनी शनिवारी सानपाडा येथे पत्रकार परिषद घेत सांगितले. या वेळी कामगार नेते मिलिंद रानडे, गजानन भोईर तसेच कर्मचारी उपस्थित होते.

या पत्रकार परिषदेत कामगारांच्या विविध मागण्या सविस्तरपणे मांडण्यात आल्या.

# रेल्वे तिकिटासाठी सानपाडा स्टेशनवर प्रवाशांची गैरसोय; उपाययोजनेची मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबईची जीवनवाहिनी म्हणून लोकल रेल्वेला ओळखले जाते. या लोकलचा प्रवास करणाऱ्या प्रवाशांना लवकर तिकीट मिळावे, त्यांना तिकिटासाठी लांबच लांब रांगेत उभे राहायला नको म्हणून मोबाईल तिकीट, व्हेंडिंगमशीन उपलब्ध करून देण्यात आल्या, मात्र त्या मशीन नादुरुस्त होऊ लागल्यामुळे प्रवाशांना तिकिटासाठी पुन्हा रांगेत उभे रहायला लागत आहे.

सानपाडा रेल्वेस्थानकातील एटीव्हीएम आणि व्हेंडिंग मशीन बसवण्यात आल्या आहेत, मात्र ह्या मशीन कधी चालू तर कधी बंद असतात त्यात तीन पैकी एन गर्दीच्या वेळीस एखादी तिकीट खिडकी उघडी असल्यामुळे प्रवाशांना तिकीट खिडकीजवळ ताटकळत उभे राहण्याची वेळ आली आहे.

सानपाडा रेल्वे स्थानकातील तिकीट खिडक्यापैकी गर्दीच्या वेळीस बऱ्याचदा एकच तिकीट खिडकी चालू असल्यामुळे अनेक वेळा प्रवासी विना तिकीट प्रवास करत असतात. एटीव्हीएम मशीन चालू असून नेहमीच काही अडचणी येत असतात. त्यात ज्या मशीन चालू आहेत, त्या मशीन सर्वच प्रवाशांना वापरता येत नाही. त्यात संध्याकाळच्या आणि सकाळच्या वेळी प्रवाशांना घाई असते, त्यात एकच तिकीट खिडकी चालू असल्यामुळे प्रवाशांची तारांबळ



उडते. अर्धा पाऊण तास तिकीट काढण्यासाठी रांगेत उभे रहावे लागते. तोपर्यंत ट्रेन निघून जातात. प्रत्येकाला लवकर पोहचण्याची घाई असते, मात्र खूप वेळ तिकीट खिडकीसमोर उभे राहावे लागते.

गर्दीच्या वेळी एकच तिकीट खिडकी चालू असल्यामुळे प्रवाशांची लांबच लांब रांग लागलेली असते. त्यात मुख्य म्हणजे तिकिटासाठी किती वेळ उभे राहणार हा विचार करून अनेक प्रवासी विनातिकीट प्रवास करतात. रांगेमध्ये उभे राहिलेले काही प्रवासी तर कंटाळून तसेच लोकल पकडायला निघून जातात. तर काही प्रवासी वेळेत तिकिट मिळत नाही म्हणून तिकीट काढायचेच टाळतात. हे वास्तव आहे.

> **इथे तिकिटासाठी अर्धा एक तास रांगेत उभे रहा. तिकीट नाही काढले तर टीसी पकडणार. दोन्ही बाजूने मरण झाले आहे. तिकीट खिडक्या असून त्यांचा उपयोग नाही. मशीनदेखील बंद असतात याचा सर्व त्रास प्रवाशांना सहन करावा लागतो.**
> **–प्रशांत चव्हाण, प्रवासी**

> **सानपाडा रेल्वे स्थानक पश्चिम दिशेला एमपीएससी बाजार संकुल आहे तसेच विविध आस्थापना आहेत. या ठिकाणी तीन तिकिट खिडक्या आहेत, तर सानपाडा रेल्वेस्थानक पूर्व दिशेला एक तिकिट खिडकी आहे. या ठिकाणी एक तिकिट खिडकी त्वरित वाढविण्यात येईल.**
> **–दत्तात्रय शिंदे, अधीक्षक, सानपाडा रेल्वे स्टेशन**

रेल्वे प्रशासनाकडून सीव्हीएम, एटीव्हीएमचे पर्याय उपलब्ध केले मात्र काही काळानंतर तेही बंद झाले. त्यानंतर कॅश, कॉईन ऑपरेटेड तिकीट मशीन बसविण्यात आले, मात्र यालादेखील प्रवाशांचा प्रतिसाद मिळाला नाही. ह्या मशीनदेखील सतत धूळखात आणि बंद पडलेल्या असतात, त्यात अनेक प्रवाशांना हे मशीन कसे हाताळायचे याची माहिती नाही. त्यामुळे अनके प्रवासी तिकीट खिडकी हाच पर्याय निवडतात, मात्र त्याही खिडक्या अपुऱ्या प्रमाणात उपलब्ध ठेवतात. त्यामुळे अनेक प्रवाशी चिडचिड करत असतात. एसीमध्ये आरामात बसलेले असतात तरी तिकीट द्यायला अडचण असते, असा आरोपदेखील काही प्रवाशी करत आहेत.

# पनवेलमधील आशा सेविकांचा सत्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमधील आशा सेविकांचा आरोग्यमंत्री यांच्या हस्ते कर्करोग करता उत्कृष्ट काम केल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

जागतिक कर्करोग दिनानिमित्त उत्कृष्ट काम करणाऱ्या आरोग्य सेविका आणि आशा सेविका यांचा प्राथमिक स्वरूपात सत्कार करण्यात आला. या वेळी आरोग्य सहाय्यक भक्ती पालकर, नमिता पाटील,



आरोग्य सेविका योगिता गुरव, सारिका पाटील, निर्मला दाभणे, विनंती पाटील यांचा यशवंतराव चव्हाण सभागृह चर्चगेट, मुंबई येथे आरोग्यमंत्र्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या सत्काराबद्दल त्यांचे तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अपर्णा पवार यांनी आणि पंचायत समितीने अभिनंदन केले आहे.

# सिंधुदुर्ग जिल्हा संघाचे स्नेहसंमेलन उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सिंधुदुर्ग जिल्हा रहिवासी हितवर्धक संस्था, पनवेल या संस्थेचे वार्षिक स्नेहसंमेलन पनवेल येथील फडके नाट्यगृहात झाले. डॉ. भगवान बिरमोळे हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. तसेच उद्योजक मंगेश परुळेकर, सिंधुदुर्ग येथील अभियंता अजयकुमार सर्वगौड, युवा नेते मंगेश अपराज, आदी मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

संस्थेच्या वाटचालीमध्ये मोलाचे योगदान दिलेल्या सभासदांचा सन्मान करण्यात आला. रमाकांत चव्हाण व संजय साटम यांना 'जीवन गौरव' आणि पत्रकार संजय कदम याना 'सिंधुरत्न' या पुरस्कारांनी गौरविण्यात आले. त्याचबरोबर यशस्वी युवा उद्योजक आणि क्रीडा क्षेत्रात यश प्राप्त केलेल्या खेळाडूंचाही सत्कार करण्यात आला.

सभासद व त्यांच्या पाल्यांचे विविध गुणदर्शनपर सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न




झाले. प्रसन्नकुमार घागरे दिग्दर्शित भव्यदिव्य वारकरी दिण्डीने कार्यक्रमाची सांगता झाली. वैभवी मराळ यांनी निवेदन केले. संघाची कार्यकारिणी व कार्यकर्त्यांनी हा सोहळा यशस्वी करण्यासाठी मोलाचे योगदान दिले.

## क्लिक...क्लिक...!



**मुरुड : फणसाड अभयारण्यात आढळणारे वटवट्या निळा कस्तुर, सामान्य खंड्या, शिपाई बुलबुल स्ववलधारी बुलबुल नेहमीच पहायला मिळतात. पर्यटक खास पक्ष्यांची चित्रण करण्यासाठी येतात. वनक्षेत्रपाल हरिश्चंद्र नाईक त्यांना मार्गदर्शन करतात.** (छाया : सुधीर नाझरे)

# पोलीस पाटीलांना नवीन कायद्याविषयी मार्गदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पोलीस पाटीलांची बैठक घेऊन त्यांना नवीन कायद्याविषयी मार्गदर्शन वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक आनंद कांबळे यांनी केले.



या वेळी अधिकारी वर्गांनी उपस्थित पोलीस पाटीलांना आवश्यक त्या सुचना देताना सांगितले की, आगामी सण उत्सव कार्यक्रमांबाबत आगाऊ माहिती पोलीस ठाणे देणे, विनापरवाना राहणारे परदेशी नागरिकांची माहिती, भाडेकरूंची परिपूर्ण माहिती संकलित करणे, पोलिसांचे व्हॉट्सअॅप चॅनेल, तसेच इतर हेल्पलाईन बाबत यापूर्वीच दिलेल्या निर्देशांप्रमाणे कार्यवाही करणे, महिला मुली ज्येष्ठ नागरिक यांच्या सुरक्षेबाबत माहिती दिली आहे. तसेच उपस्थितांना नवीन कायद्यांविषयी मार्गदर्शन करण्यात आले. या वेळी हद्दीतील ४२ पोलीस पाटील उपस्थित होते.

# दिवेआगरमध्ये रस्त्यांवर खड्डे

## ◆ गंभीर अपघाताची शक्यता; प्रशासनाने तत्काळ दखल घेण्याची नागरिकांची मागणी

**श्रीवर्धन : रामप्रहर वृत्त**

दिवेआगर येथील श्री सुवर्ण गणेश प्रकटस्थान व समुद्रकिनारी जाणाऱ्या सुवर्ण गणेश पाखाडी येथील मुख्य रस्ता खचला असून रस्त्याच्या दुतर्फा जीवघेणे भलेमोठे खड्डे पडले आहेत. वाहनचालकांना खचलेल्या रस्त्यावरील खड्ड्यांचा अंदाज येत नसल्याने वाहनांचे सर्रास अपघात घडत आहेत. येथील रस्त्याचे काम मागील काही दिवसांपासून अपूर्ण अवस्थेत रखडले असून वाहनचालक व स्थानिक व पर्यटकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे स्थानिक प्रशासनाने याबाबत दखल घेऊन तत्काळ उपाययोजना करावी, अशी संतापजनक मागणी स्थानिक नागरिक तसेच पर्यटकांकडून केली जात आहे.



रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन तालुक्यातील अमर्याद विस्ताराचा समुद्रकिनारा लाभलेले दिवेआगर हे अस्सल कोकणी टुमदार गाव आहे. दिवेआगरमध्ये श्री सुवर्ण गणेश प्रकट झाल्यानंतर पर्यटकांचा ओढा दिवेआगरकडे अधिक वाढला आहे. त्यामुळे पर्यटन स्थळाबरोबरच तीर्थक्षेत्र म्हणुनही दिवेआगरचा संपूर्ण देशभरात लौकिक आहे. याठिकाणी परदेशी पाहुणेही मोठ्या संख्येने येत असतात. विकेंडला, सुट्टीच्या दिवशी दिवेआगरमध्ये पर्यटकांची मोठी गर्दी होत असते, मात्र अशातच गावांमधील अंतर्गत रस्त्यांवर वाहतूक कोंडीची समस्याही जटिल होत चालली आहे. याचे मुख्य कारण म्हणजे गावातील डागडुजीविना रखडलेले अपूर्ण अवस्थेतील रस्ते व रस्त्यांवरील भलेमोठे खड्डे हे आहे. रस्त्यांमुळे निर्माण होणाऱ्या वाहतूक वाहतूक कोंडीचा स्थानिकांना मोठ्या प्रमाणात मनस्ताप सहन करावा लागतो.

सुवर्ण गणेश पाखाडी येथील रस्त्याच्या डागडुजीचे काम काही दिवसांपासून संथगतीने सुरू आहे, मात्र येथील मुख्य रस्त्यावरील वळणावर दुतर्फा रस्ता खचला असून भले मोठे खड्डे पडल्याने गंभीर समस्या निर्माण झाली आहे. रस्त्यावरून जाताना लांबून सहजासहजी खड्डा निदर्शनास येत नसल्याने अनेक दुचाकीस्वारांना या खड्डड्यात पडून दुखापत देखील झाली आहे. तर अनेक चारचाकी वाहनांचे नुकसानही होत आहे. संध्याकाळनंतर काळोख पडल्यावर वाहनचालकांसह पादचाऱ्यांनाही खचलेल्या रस्त्यावरील खड्डे सहजासहजी निदर्शनास येत नाहीत. तर काही वाहनचालकांना अचानकपणे खड्डा समोर आल्याने वाहनावर नियंत्रण करणे अवघड होते. परिणामी याठिकाणी लहानमोठे अपघाताचे प्रसंग ओढावत आहेत. त्यामुळे स्थानिकांसह पर्यटकांमधून स्थानिक प्रशासनाविरोधात प्रचंड संताप व्यक्त केला जात आहे.

**“ मागील काही दिवसांपासून सुवर्ण गणेश पाखाडी येथील येथील रस्त्याचे काम अर्धवट स्थितीत आहे. रस्त्याच्या दुतर्फा पडलेल्या धोकादायक खड्ड्यांमुळे अपघातांचे सर्रास प्रसंग घडत आहेत. रात्रीच्या वेळी हे खड्डे दृष्टीस येत नसल्याने काही पादचारी येथील खड्ड्यात पडून किरकोळ दुखापत झाल्याच्याही तक्रारी आहेत. खड्ड्यांमध्ये वाहने आपटून वाहनांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. स्थानिक प्रशासनाने याबाबत दखल घेऊन तत्काळ उपाययोजना करावी.**

**–मकरंद जोशी, स्थानिक, दिवेआगर**

# खालापूर तालुक्यातील शाळा दुरुस्तीसाठी निवेदन

## * आमदार निरंजन डावखरेंकडून निधीचे आश्वासन



**खालापूर : रामप्रहर वृत्त**

कोकण पदवीधर मतदारसंघाचे आमदार निरंजन डावखरे यांची खालापूर तालुका अध्यक्ष सनी यादव यांनी भेट घेवून खालापूर तालुक्यातील मराठी शाळांची दुरुस्ती आणि सोयीसुविधा उपलब्ध करून देणेबाबत निधी देण्यात यावा याकरिता खालापूर भाजपच्या वतीने निवेदन देऊन त्यावर चर्चा केली. लवकरच अशा शाळांकडे विशेष लक्ष देऊ असे आश्वासन आमदार महोदयांनी दिले.

विशेषतः ग्रामीण भागातील जिल्हा परीषद शाळांकडे जिल्हा परिषद दुर्लक्ष झाले असून पावसाळ्यात अनेक शाळांमध्ये विद्यार्थी यांना त्रास सहन करावा लागत आहे. तसेच आजही अनेक शाळांमध्ये सोयीसुविधा यांचा वानवा दिसत असून आपल्या माध्यमातून शाळा दुरस्ती व सोयीसुविधा साठी निधी उपलब्ध व्हावा, असे पत्र देण्यात आले.

या वेळी खालापूर तालुका मंडळ अध्यक्ष सनी यादव, खालापूर तालुका सरचिटणीस रवींद्र पाटील, भाजपा युवा मोर्चा तालुका अध्यक्ष नागेश पाटील, खालापूर शहर अध्यक्ष दिपक जगताप, वाहतूक सेल अध्यक्ष हरीभाऊ जाधव, मोहन घाडगे आदी पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# हळदीकुंकू कार्यक्रमातून महिलांना प्रोत्साहन -ना. आदिती तटकरे

**पेण : प्रतिनिधी**

महिलांचा सर्वांत आवडता सण म्हणजे हळदीकुंकू समारंभ या माध्यमातून महिलांना एक प्रकारे प्रोत्साहन देण्याचे काम माजी नगराध्यक्ष प्रितम पाटील या गेली अनेक वर्षे करीत आहे असे गौरवोद्गार महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांनी पेण मध्ये आयोजित हळदीकुंकू समारंभात काढले.





भारतीय जनता पक्ष पेण आयोजीत हळदीकुंकू समारंभ नागरपालिकेच्या मैदानावर आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे, आमदार रविशेठ पाटील, रा.जि.प. माजी अध्यक्ष निलिमा पाटील, राजिप माजी सदस्या कौसल्या पाटील, मा. गटनेते अनिरुद्ध पाटील, अजय क्षिरसागर, दयानंद भगत, जितेंद्र ठाकूर, वसुधा पाटील, सुषमा पाटील, प्रतिभा पाटील, वैशाली मपारा आदींसह भाजप, राष्ट्रवादी काँगेस महायुतीचे पदाधिकारी उपस्थित होते.

या वेळी महिलांना मार्गदर्शन करताना आदिती तटकरे यांनी सांगितले कि, जो तुमच्या आयुष्यामध्ये तुम्हाला एक आनंदाचे काही क्षण देऊन जाईल, असा प्रयत्न या समारंभाच्या माध्यमातून प्रितम पाटील व त्यांच्या सहकार्यांनी केला आहे.

शासनाकडून विविध योजना राबवत असताना पहिला प्रयत्न जो आम्ही केला तो स्त्रीला स्वतः चा अस्तित्व हे कुठे ना कुठेतरी समाजामध्ये जाणीव करून देण्याचा केला यापुढे बाळाच्या नावापुढे त्याच्या आईचे नाव लावले जाईल. पेणमधील लोकप्रिय नेतृत्व व अनुभव असेलेले आमदार रविशेठ पाटील हे लोकप्रतिनिधी म्हणून मुख्यमंत्र्यांकडे किंवा उपमुख्यमंत्र्यांकडे जात असताना जो एक वर्चस्व आपण तयार केलेला आहात तसेच जो एक आदर त्या लोकप्रतिनिधीबद्दल असतो त्यातून आपण अनेक गोष्टी साध्य केल्या आहेत. नगर परिषदेच्या निवडणुका गेल्या अडीच तीन वर्षांपासून झाल्या नसल्या तरीही आपले आधारस्तंभ रविशेठ पाटील यांच्या माध्यमातून अनेक विकासकामे पेणमध्ये काम होत राहिले. त्यामुळे त्यांचे नेतृत्वाखाली पुढे आपण नगर परिषद असेल किंवा विधानसभा मतदारसंघांमध्ये काम करत राहालच आम्ही सुद्धा ज्या ज्या वेळेला आपल्याला गरज लागेल किंवा आमचे सहकार्य लागेल त्या त्या वेळेला निश्चितपणाने आहोत असा अभिवचन शेवटी अदिती तटकरे यांनी प्रितम पाटील यांना दिले. या वेळी त्यांनी उपस्थित महिलांना नवीन वर्ष आरोग्यमय, उन्नतीचे जावो तुमच्या कुटुंबासाठी अतिशय यशमय जावो, अशा शुभेच्छा दिल्या.

आमदार रविशेठ पाटील यांनी कार्यक्रमाला उपस्थित राहून महिलांचे आभार मानण्यासाठी आलो असून मोठ्या मताधिक्क्याने मला विधानसभा निवडणुकीत निवडून दिले यामध्ये महिला वर्गाचा मोठा वाटा आहे, असे त्यांनी सांगितले.

या वेळी माजी नगराध्यक्ष प्रितम पाटील यांनी येणाऱ्या काळात आपला देश हा महासत्तेकडे जाणार असून जीडीपीच्या बाबतीत जो देश पाचव्या नंबरवर तो येणाऱ्या काळात तिसऱ्या नंबरवर जाईल आणि त्यावेळेस महिलांसाठी घेतलेल्या निर्णयामुळे आपल्या देशात झालेल्या प्रगतीमध्ये महिलांचा योगदान मोलाच असेल म्हणून आपण आपल्या भारतीय जनता पक्षाचा महायुतीचा मनापासून आभार मानत आहे.

# माझी वसुंधरा अंतर्गत खरीवली ग्रामपंचायतीतर्फे विविध उपक्रम

**चौक : प्रतिनिधी**

माझी वसुंधरा ५.० अंतर्गत ग्राम पंचायत खरीवली यांनी विविध पर्यावरण पूरक आणि सामाजिक उपक्रम राबविण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे दुर्गम ग्रामीण भागातील माझी वसुंधरा उपक्रम राबविण्यास सुरुवात झाली आहे.

खालापूर तालुक्यातील ग्रामपंचायत खरीवली ही अनेक वाड्या वस्त्या मधुन विखुरली आहे. दुर्गम ग्रामीण भागातील जनतेसाठी काम करण्यास वेगळी ऊर्जा मिळते, असे ग्राम पंचायत अधिकारी मनाली महेश म्हसे यांनी सांगून माझी वसुंधरा ५.० अंतर्गत राबवित असलेल्या उपक्रमाची माहिती दिली. हा परिसर ग्रामीण भागातील असल्याने दळण वळण साधने होणे गरजेचे आहे. लोक संपर्क साधावा लागत असून अनेक माझी वसुंधरा कार्यक्रम अंतर्गत ग्राम पंचायत खरीवली यांनी माझी वसुंधरा ५.० अंतर्गत ग्राम पंचायत हद्दीतील प्राथमिक शाळांमधन स्पर्धा घेण्यात आली,



या वेळी मुलांच्या कौशल्य गुणांची पारख करून त्यांना प्रोत्साहित करण्यात आले. प्लास्टिक पिशव्या बंदी, झाडे लावा, वृक्षारोपण करून त्याची जोपासना करण्यासाठी कटिबद्ध राहण्याचा संकल्प सोडण्यात आला.

शाश्वत शेतीची जनजागृती करण्यात आली असून सेंद्रिय खत, गांडूळ खत व जिवामृत याचा वापर करून उत्तम पद्धतीने भाजीपाला पिके लागवड करण्यात येत आहे. अशी माहिती अशोक पाटील, विष्णू पाटील यांसारखे अनेक प्रगत शेतकऱ्यांनी दिली. माझी वसुंधरा अभियान अंतर्गत शेतकरी सेंद्रिय शेती कडे वाटचाल करीत असलेल्या शेतकरी यांना कृषि उत्पन्न विषयी माहिती देण्याचे शिबिर आयोजित करण्यात येत आहे.

स्वच्छता अभियान राबविण्यात येत असून सर्व ग्रामस्थांनी माझी वसुंधरा ५.० अभियान यशस्वी करण्यासाठी सामुदायिक शपथ घेतली. सरपंच सुंदर पवार, उपसरपंच सुशांत विचारे, निलेश शिंदे, सर्व सदस्य, ग्राम पंचायत कर्मचारी, ग्रामस्थ, विद्यार्थी, शिक्षक, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर, बचत गट यांचा सहभाग मोठ्या प्रमाणात मिळत असल्याचे सरपंच सुंदर पवार यांनी सांगितले.

# सिद्धेश रघुवीर आणि किशोर शिताळे यांना भूमिपुत्र सन्मान

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

दि.बा.पाटील यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त एकविरा कला, क्रीडा, सामाजिक आणि शैक्षणिक संस्था, पनवेल आणि बी. के. पाटील फाऊंडेशन, केळवणे यांच्या वतीने आयोजित ’भूमिपुत्र सन्मान २०२५’ या प्रतिष्ठित कार्यक्रमात श्रीवर्धनचे प्रसिद्ध ढोलकीवादक सिद्धेश पांडुरंग रघुवीर आणि म्हसळा येथील शिवशाहीर किशोर काशिनाथ शिताळे यांना भूमिपुत्र पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



रविवारी कराडी समाज हॉल, कामोठे येथे झालेल्या या भव्य कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून आमदार प्रशांत ठाकूर उपस्थित होते. आमदार ठाकूर यांनी आपल्या हस्ते पुरस्कार प्रदान केला.

या वेळी सिद्धेश रघुवीर आणि किशोर शिताळे यांचे कर्तृत्व आणि योगदान यावर प्रकाश टाकला गेला. दोन्ही कलाकार आपल्या क्षेत्रातील नेत्यांमध्ये स्थान मिळवून सर्व स्तरावर कौतुकाचे पात्र ठरले आहेत.

सिद्धेश रघुवीर, जो मूळगाव कोळीवाडा, श्रीवर्धनचा आहे, त्याने ढोलकी वादनाच्या कलेला उच्च शिखरावर नेले आहे. त्याच्या गजरात ढोलाचा आवाज आज सर्वत्र ऐकायला मिळतो तसेच किशोर शिताळे हे म्हसळा येथील शिवशाहीर आपल्या गाण्यांनी लोकांमध्ये जागृती निर्माण करतात.

या कार्यक्रमाच्या माध्यमातून त्यांच्या कलेच्या योगदानाचे मानांकन करण्यात आले. या वेळी सर्व उपस्थितांनी या दोन्ही कलाकारांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

# धावीर महाराजांच्या दर्शनासाठी लाखे दाम्पत्याची पायी वारी



**धाटाव : प्रतिनिधी**

साऱ्या जगाला पंढरपूरच्या वारीचे अप्रूप आहे. त्याचप्रमाणे सातारा जिल्ह्यातील लोणंद, वाई तसेच जेजुरी, सासवड येथून आपल्या कुटुंबकबिल्यासह रोह्याचे ग्रामदैवत श्री धावीर महाराजांच्या वारीला येण्याची दोनशे वर्षांपासूनची परंपरा आहे. लोणंद येथील भाविक रवि लाखे आणि त्यांच्या पत्नी सुनीता रवि लाखे यांनी रोह्याचे ग्रामदैवत श्री धावीर महाराज यांच्या दर्शनासाठी लोणंद ते रोहा अशी १८२ किमीची पदयात्रा शनिवारी (दि.८) सायंकाळी पूर्ण केली.

३१ जानेवारी ते ६ फेब्रुवारी दरम्यान आठ दिवसांच्या श्री धावीर महाराज पदयात्रेचे आयोजन करण्यात आले होते. रोह्याच्या प्रवेशद्वारावर देवस्थानचे उपाध्यक्ष नितीन परब, खजिनदार महेश सरदार, विश्वस्त संदीप सरफळे, महेश चाळके, समीर साळवी, राहुल मोहिते, विशाल शेलार, शैलेश रावकर, भरत गुरव, दिनेश मोहिते आदींनी लाखे उभयतांचे स्वागत केले.

# डिकसळमध्ये रमाबाई आंबेडकर जयंती उत्साहात

**कर्जत : प्रतिनिधी**

त्यागमूर्ती माता रमाबाई आंबेडकर यांची १२७वी जयंती ७ फेब्रुवारी रोजी डिकसळ येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात साजरी करण्यात आली. रमाबाई महिला मंडळाच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, माता रमाबाई आंबेडकर यांच्या प्रतिमांना महिला मंडळाच्या ज्येष्ठ हिराबाई हिरे, शांताबाई गायकवाड, मीराबाई हिरे, कमल ब्राह्मणे यांच्या हस्ते पुष्प अर्पण अगरबत्ती मेणबत्ती दीप प्रज्वलित करण्यात आली.

बुद्ध वंदना उपासक सुनील जाधव, रमेश गायकवाड यांनी घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिव तनुजा गायकवाड यांनी केले.

माता रमाबाई आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या जीवनावर हिराबाई हिरे, रेखा गायकवाड, संगीता गायकवाड, यांनी मनोगत व्यक्त केले. रमाबाई महिला मंडळ वतीने संगीत खुर्ची, चमचा लिंबु, कपाळावर टिकली लावणे असे अनेक खेळ खेळण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रमाबाई महिला मंडळाचे अध्यक्षा शुभांगी साळवी, उपाध्यक्षा मोनिका गायकवाड, सारिका हिरे, यांनी मेहनत घेतली.



# मुंबई इंडियन्सचा आफ्रिकेतही डंका

## एसए टी-२० स्पर्धेचे विजेतेपद पटकाविले



**जोहान्सबर्ग : वृत्तसंस्था**

दक्षिण आफ्रिकेत झालेल्या एसए टी-२० स्पर्धेत मुंबई इंडियन्सची मालकी असलेल्या संघाने जेतेपदावर नाव कोरले. एमआय केपटाऊन संघाने जोहान्सबर्ग येथे झालेल्या अंतिम लढतीत सनरायझर्स इस्टर्न केप संघाची जेतेपदाची हॅट्ट्रिक रोखली. योगायोग म्हणजे अंतिम लढतीतला मुंबईचा प्रतिस्पर्धी संघ सनरायझर्स या संघाची मालकी आयपीएलमधल्या सनरायझर्स हैदराबाद संघाकडेच आहे.

मुंबई इंडियन्स संघाने आयपीएल स्पर्धेचे जेतेपद पाचवेळा पटकावले आहे, तर चॅम्पियन्स लीग स्पर्धेचे जेतेपद दोनदा जिंकले आहे. वूमन्स प्रीमिअर लीगचे जेतेपदही त्यांनी मिळवले आहे. मेजर लीग क्रिकेट स्पर्धेत ते अजिंक्य होते, आयएल टी-२० स्पर्धेत गेल्या वर्षी त्यांनीच जेतेपदावर नाव कोरले. विजयी परंपरा कायम राखत त्यांनी दक्षिण आफ्रिका २० स्पर्धेच्या जेतेपदावर कब्जा केला.

एमआय केपटाऊन संघाने प्रथम फलंदाजी करताना १८१ धावांची मजल मारली. प्रत्युत्तरादाखल खेळताना सनरायझर्स केपचा डाव १०५ धावांतच आटोपला. ट्रेंट बोल्टला सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आले, तर २०४ धावा आणि १९ विकेट्स अशी अष्टपैलू कामगिरी करणाऱ्या मार्को यान्सनला मालिकावीर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

एमआय केपटाऊन संघातर्फे कॉनर इस्टरह्यूझनने ३९ आणि डेवाल्ड ब्रेव्हिसने ३८ धावांची खेळी केली. सलामीवीर रायल रिकलटनने ३३ धावा केल्या. सनरायझर्स संघातर्फे मार्को यान्सन, रिचर्ड ग्लिसन, लायन डॉसन यांनी प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या. रशीद खान, ट्रेंट बोल्ट, कागिसो रबाडा असे भेदक आक्रमण असलेल्या मुंबईने सनरायझर्स संघाला १०५ धावांतच गुंडाळले. रबाडाने चार आणि बोल्टने दोन विकेट्स पटकावल्या. टॉम अबेलने ३० धावा केल्या.

# वायएससीएल प्रीमियर लीगचा पीवायसी किंग संघ विजेता

**मुरूड : प्रतिनिधी**

दिल्ली येथे झालेल्या वायएससीएल प्रीमियर लीगमध्ये पीवायसी पँथर्सचा धुवा उडवत पीवायसी किंग संघाने विजेतेपद पटकाविले. या वेळी मुरूडमधील खेळाडू सुयोग भोसले याने पीवायसी किंग संघाकडून खेळताना शानदार शतक ठोकले.

सुयोग जगदीश भोसले याला सुरुवातीपासून क्रिकेट खेळण्याची आवड होती, परंतु मुरूडमध्ये सिझन बॉलसाठी मैदान व अन्य सुविधा, व्यवस्था नसल्याने त्याने ठाणे येथील नातेवाईकांकडे राहून शिक्षण घेत क्रिकेटचा सराव सुरू केला. त्याचा खेळ पाहून त्याची पुणे येथील वायएससीएल संघाच्या कर्णधारपदी निवड करण्यात आली. या संधीचे सोने करीत त्याने दमदार कामगिरी केली. अंतिम सामन्यात सुयोगने ५४ चेंडूत १०४ धावा करून संघाला विजय मिळवून दिला.

### सुयोग भोसलेची शतकी खेळी



त्याला सामनावीराचा किताब देऊन गौरविण्यात आले. याबद्दल त्याचे कौतुक व अभिनंदन केले जात आहे.

# 'डब्ल्यूटीसी'मध्ये ऑस्ट्रेलियाने मोडला भारताचा विक्रम

## सर्वाधिक १३ सामने जिंकले

**गॅले : वृत्तसंस्था**

डब्ल्यूटीसी २०२३-२५ स्पर्धेच्या इतिहासात ऑस्ट्रेलियन संघाचे वर्चस्व श्रीलंकेतही दिसून आले, ज्यामध्ये त्यांनी स्टीव्हन स्मिथच्या नेतृत्वाखाली दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेत क्लीन स्वीप केले आणि वर्ल्ड टेस्ट क्रिकेटच्या इतिहासात टीम इंडियाचा एक मोठा विक्रमही मोडला.

या कसोटी मालिकेतील दोन्ही सामने गॅले स्टेडियमवर खेळले गेले, ज्यामध्ये ऑस्ट्रेलियन संघाने पहिला सामना एक डाव आणि २४२ धावांनी जिंकला, तर दुसरा सामना नऊ विकेट्सने जिंकण्यात 'कांगारू' यशस्वी झाले.

ऑस्ट्रेलियन संघाने जून महिन्यात दक्षिण आफ्रिकेविरुद्ध २०२३-२५च्या जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेचा अंतिम सामना खेळणार आहे. त्याआधी त्यांनी भारतीय संघाचा जागतिक कसोटी सामन्याच्या चक्रात सर्वाधिक सामने जिंकण्याचा विक्रम मोडला आहे. २०१९-२१मध्ये खेळल्या गेलेल्या पहिल्या जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेत टीम इंडियाने एकूण १२ सामने जिंकले होते, तर ऑस्ट्रेलियन संघाने आता २०२३-२५च्या जागतिक कसोटी स्पर्धेत एकूण १३ सामने जिंकून टीम इंडियाचा हा विक्रम मोडला आहे. या डब्ल्यूटीसी सायकलमध्ये ऑस्ट्रेलियाची श्रीलंकेविरुद्धची ही शेवटची द्विपक्षीय मालिका होती.

गॅले स्टेडियमवर श्रीलंकेविरुद्धचा दुसरा कसोटी सामना नऊ विकेट्सने जिंकून ऑस्ट्रेलियन संघाने १४ वर्षांनंतर श्रीलंकेत कसोटी मालिका जिंकण्यात यश मिळवले.

### स्मिथने केली कॅलिसच्या विक्रमाची बरोबरी

श्रीलंकेविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्याच्या चौथ्या दिवशी स्लिपमध्ये कुसल मेंडिसला झेल घेऊन ऑस्ट्रेलियाच्या स्टीव्हन स्मिथने २०० झेल पूर्ण केले. या बाबतीत स्मिथने दक्षिण आफ्रिकेचा माजी दिग्गज खेळाडू जॅक कॅलिसच्या विक्रमाची बरोबरी केली, ज्यामध्ये त्याने क्षेत्ररक्षक म्हणून कसोटीत २०० झेल घेतले होते. स्मिथच्या आधी कसोटी क्रिकेटमध्ये नॉन-यष्टिरक्षक म्हणून फक्त चार खेळाडूंनी २०० किंवा त्याहून अधिक झेल घेतले आहेत. या यादीत सर्वात वरच्या क्रमांकावर राहुल द्रविड आहे, ज्याने कसोटी क्रिकेटमध्ये एकूण २१० झेल घेतले आहेत.

# रचीन रवींद्र मैदानात दुखापतग्रस्त; पाकिस्तानवर टीकेची झोड

**लाहोर : वृत्तसंस्था**

पाकिस्तान आणि न्यूझीलंड यांच्यादरम्यानच्या वनडेदरम्यान न्यूझीलंडचा क्रिकेटपटू रचीन रवींद्रला झालेल्या दुखापतीमुळे पाकिस्तानवर पुन्हा एकदा जोरदार टीका होत आहे. चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. तब्बल तीन दशकांनंतर पाकिस्तानात आयसीसी स्पर्धेचे आयोजन होत आहे, मात्र व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह व्यक्त होत आहे.

पाकिस्तानच्या डावादरम्यान ३८व्या षटकात ब्रेसवेलच्या गोलंदाजीवर खुशदिलने फटका खेळला. रचीन तेव्हा डीप स्क्वेअर लीग इथे क्षेत्ररक्षण करत होता. चेंडू पकडण्यासाठी तो पुढे सरसावला, मात्र चेंडू त्याच्या कपाळावर जाऊन आदळला. या आघातामुळे रचीन खाली पडला. काही वेळानंतर तो सावध झाला, पण तोवर रक्त वाहू लागले होते. न्यूझीलंड संघाचे डॉक्टर तसेच राखीव खेळाडूंनी मैदानात धाव घेतली. पाकिस्तान संघाच्या डॉक्टरांनाही मैदानात धाव घेतली. चाहतेही काही क्षण भांबावून गेले.

रचीनवर मैदानातच उपचार करण्यात आले. रक्त थांबावे यासाठी





आईसपॅक लावण्यात आला. रचीनची कॉंकशन टेस्ट घेण्यात आली. बाकी व्यवस्थित असल्याने रचीन वैद्यकीय चमूच्या साथीने मैदानाबाहेर गेला.

दरम्यान, न्यूझीलंड क्रिकेटच्या निवेदनात म्हटले आहे की, झेल घेताना चेंडू कपाळावर लागल्याने रवींद्रला मैदान सोडावे लागले. त्याच्या कपाळाला जखम झाली असून त्याच्यावर मैदानावर उपचार करण्यात आले आणि तिथेच त्याला टाकेही घालण्यात आले. आता तो ठिक आहे आणि त्याच्या दुखापतीवर लक्ष ठेवले जात आहे. दक्षिण आफ्रिकेविरुद्ध होणाऱ्या सामन्यात रचिन खेळू शकणार नाही.

लॉकी फर्ग्युसनच्या हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीमुळे न्यूझीलंड आधीच चिंतेत आहे. आता रचिनची दुखापतही संघासाठी टेन्शनची गोष्ट ठरली आहे. चॅम्पियन्स ट्रॉफी सुरू होण्यापूर्वी तो तंदुरुस्त होईल आणि लवकरच संघासाठी मैदानावर अशी संघ व्यवस्थापनाला आशा आहे.

चॅम्पियन्स ट्रॉफी तोंडावर आलेली असताना अनेक संघांना दुखापतीमुळे संघात मोठे बदल करावे लागले आहेत. त्यामुळे रचिन दुखापतीमुळे संघाबाहेर असणंस किवी संघासाठी धक्का देणारं असेल, कारण आशियाई परिस्थितीत त्याची कामगिरी महत्त्वपूर्ण असणार आहे.

या स्पर्धेसाठी पाकिस्तानमध्ये मैदानांचे नूतनीकरण करण्यात आले आहे, मात्र ही मैदाने आंतरराष्ट्रीय सामन्यांच्या आयोजनाकरिता तयार आहेत का याविषयी उलटसुलट चर्चा सुरू आहेत. भारतीय संघ पाकिस्तानला जाणार नसल्याने भारताचे सामने दुबईत खेळवण्यात येणार आहेत. उर्वरित देशांच्या संघांचे सामने पाकिस्तानमध्येच होणार आहेत.

### प्रकाश यंत्रणेवर प्रश्नचिन्ह

दरम्यान कृत्रिम प्रकाश यंत्रणा नीट नसल्यामुळे रचीनला चेंडू दिसला नाही आणि अपघात झाला असे म्हणत अनेकांनी पाकिस्तान क्रिकेट बोर्डावर टीका केली आहे. पाकिस्तानचे माजी कर्णधार रशीद लतीफ यांनीही कृत्रिम प्रकाश यंत्रणेवर टीका केली आहे. एलईडी लाईट्सचा यामध्ये वापर करण्यात आला आहे. बल्बमधून प्रकाशाचा मोठा झोत बाहेर पडतो. चेंडू वेगाने तुमच्या दिशेने येतो तेव्हा प्रकाशाच्या तीव्र झोतामुळे चेंडू नेमका कुठे आहे ते टिपता येत नाही, असे लतीफ म्हणाले.



**पनवेल : ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रा. लि.च्या वतीने पीसीएल सिझन ३ क्रिकेट स्पर्धेचे आयोजन पनवेल शहरातील छत्रपती संभाजी महाराज मैदानावर करण्यात आले आहे. या स्पर्धेच्या उद्घाटन समारंभास माजी नगरसेविका नीता माळी, भाजप युवा मोर्चा शहराध्यक्ष सुमित झुंझारराव, अकबर सय्यद, अस्लम मास्तर, आतिफ मस्ते, अस्लम मुन्शी, नावेद पटेल, राजू पटेल, वसीम मस्ते, आप्पा पावसकर, ताहीर पटेल आदी उपस्थित होते.**

# तेजस, ऐश्वर्याची विक्रमी 'सुवर्ण'धाव

**डेहराडून :** प्रबळ दावेदार असलेल्या महाराष्ट्राच्या तेजस शिरसे याने १०० मीटर अडथळा शर्यतीत आपल्या लौकिकास साजेशी कामगिरी करत ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत विक्रमासह सुवर्णपदकावर नाव कोरले. महिलांच्या ४०० मीटर शर्यतीत मुंबईची ऐश्वर्या मिश्रा हिने नव्या स्पर्धा विक्रमासह सुवर्णपदकाला गवसणी घातली.

गंगा आंतरराष्ट्रीय ॲथलिट स्टेडियममध्ये रंगलेल्या या स्पर्धेत छत्रपती स्नभाजिंगरचा तेजसला तुल्यबळ लढत देणारा महाराष्ट्राचा सिद्धांत थिंगलिया (मुंबई) अर्ध्या शर्यतीत अडखळून खाली पडल्याने त्याचे हक्काचे रौप्यपदक हुकले. या गडबडीत तमिळनाडूच्या आर.मानव याने १४.०३ सेकंद वेळेसह रौप्यपदक जिंकले, तर केरळच्या महंमद लाझान याने १४.२३ सेकंद वेळेसह कांस्यपदक जिंकले.



**माणगाव : श्री काळभैरव क्रिकेट संघ नाईटणेच्या वतीने आयोजित होडगाव येथील क्रिकेट स्पर्धेचे उदघाटन रायगडभूषण भागोजीबुवा डवले यांच्या हस्ते रविवारी करण्यात आले.** (छाया : सलीम शेख)










दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com